
75



भारताचा इतिहास



अकबराच्या मरणानंतर एका आठवड्यानें आग्रा येथें सलीम हा नूरुद्दीन महंमद जहांगीर बादशाह गाजी या नांवानें गादीवर बसला. त्या वेळीं त्याचें वय ३६ वर्षांचें होतें तो गादीवर बसल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्याचा मोठा मुलगा खुश्रू यानें बापाच्याविरुद्ध बंड केलें. खुश्रूवर त्याचा आजा अकबर व मामा मानसिंह दोघांचें फार प्रेम होतें. अकबर जिवंत असतांनाच खुश्रूचें त्याच्या बापाशीं पटत नव्हतें.

बाप गादीवर बसल्यानंतर पांच महिन्यांनी खुश्रू आग्र्याहून पंजाबांत पळून गेला व बंडाचें निशाण उभारलें. जहांगीर आपल्या मुलाच्या समाचारास निघाला. दोघांचें युद्ध झालें व त्यांत खुश्रूचा पराभव झाला. जहांगीरनें भरल्या दरबारांत त्याच्यावर आपला राग काढला व त्याला कैदेची शिक्षा दिली. त्याला ज्यांनी ज्यांनी मदत केली होती त्यांना हालहाल करून ठार केलें. सन् १६२२ मध्यें खुश्रू तुरुंगांतील हाल सहन न झाल्यामुळें मरण पावला.

सन् १६११ च्या मे महिन्यांत जहांगीरनें नूरजहानशीं लग्न केलें. तिचें मूळ नांव मेहरुन्नीसा असें होतें. लग्नाच्या पूर्वी तिचें लग्न 'अलीकुलीबेग इस्तझी' नांवाच्या एका इराणदेशीय रहिवाश्याशीं झालें होतें. त्यानेंच 'शेर अफगाण' नांवाची पदवी व बंगालमध्यें एक जहागीर मिळविली होती.

या शेर अफगाणानें दिल्लीच्या बादशाहाविरुद्ध बंडाळी सुरू केली. जहांगीरानें कुतुबुद्दीन नांवाच्या सरदाराला एक मोठें सैन्य देऊन पाठविलें. त्या युद्धांत कुतुबुद्दीन मारला गेला. परंतु त्याच्या अनुयायांनीं शेर अफगाणाचा वध केला. मेहरुन्नीसा आपल्या एकुलत्या एका मुलीबरोबर जहांगीराच्या अंतःपुरांत आली. चार वर्षानंतर ती जहांगीराशीं लग्नाला तयार झाली व त्याची पट्टराणी झाली. जहांगीरानें तिला 'नूरजहान' म्हणजे 'जगज्ज्योति' ही पदवी देऊन तिचा आदर केला. नूरजहान खरोखरच फार सुंदर होती. त्याच बरोबर ती फार हुशार व कला प्रिय पण होती. परंतु तिला राज्याधिकाराचा मोह सर्वांत जास्त होता. तिनें आपल्या पतीला पूर्णपणें आपल्या मुठींत करून घेतलें. आपल्या बापाला व भावाला मोठमोठे हुद्दे दिले व आपल्या पहिल्या लग्नाच्या मुलीचें लग्न जहांगीराच्या सर्वांत धाकट्या मुलाशीं करून देऊन व्यवहारांतील आपलें चातुर्य दाखविलें.

जहांगीराच्या कारकीर्दींत मोगलांना कांहीं प्रदेश आपल्या अमलाखालीं आणण्यांत चांगलें यश मिळालें. बंगाल प्रांतांत अफगाण मोगलांच्या सत्तेविरुद्ध बंडाळी करीत होते. १६१२ मध्यें उस्मानखानाच्या नायकत्वाखालीं बंडाळी करणाऱ्या अफगाणांचा निमोड झाला. उस्मानखानाच्या डोक्यालाच जबर जखम झाली व त्यांत तो



मरण पावला. त्यानंतर अफगाणांनीं बंगाल प्रांतांत डोकेंवर काढलें नाहीं. त्याचप्रमाणें मेवाड देशील मोगलांच्या अमलाखालीं आला तो प्रथम जहांगिराच्या काळांतच.

दक्षिणेकडे मोगल सैन्य अहंमदनगराच्या सैन्याशीं बरेच दिवस युद्ध करीत होतें. हें युद्ध चालू ठेवणारा मोगल योद्धा युवराज खुर्रम होता. १६१६ मध्यें त्यानें कांहीं काळ अहंमदनगराचा किल्ला स्वाधीन केला होता. तेव्हां त्याचा बाप जहांगीर यानें त्याला शहाजहां ही पदवी बहाल केली. कोट्यवधी रुपये या मोहिमेंत खर्च झाले

होते. सहस्रावधि वीर रणांगणावर हताहत झाले. परंतु मोगल साम्राज्याची दक्षिणेकडील सीमा एक इंचभर देखील वाढली नाहीं.

नूरजहां आपला जांवई शहरयार याला गादीचा वारस करणार आहे असें समजून शाहजहाननें बापाविरुद्ध बंड केलें. परंतु १६२३ मध्यें त्याचा पराभव झाला. १६२५ मध्यें त्यानें बापाशी संधी केली. आपला मोठा मुलगा दाराशिकोह व औरंगजेब या दोघांना राजधानीस पाठवून स्वतः आपली बायको मुमताजमहल व सर्वांत धाकटा मुलगा मुराद याच्या सह तो नाशिक येथें राहूं लागला.

शाहजहानचा पराभव होण्यास मुख्य कारण महाबतखान हा महाप्रतापी सेनापति होता. तो शौर्य व बुद्धि यांच्या बळावर यशाची पायरी चढत चालला होता. तें नूरजहानला पाहवलें नाहीं व त्याची मानखंडी व्हावी म्हणून तिनें प्रयत्न सुरू केला. म्हणून महाबतखानानें बादशाहाविरुद्ध बंड केलें. जहांगीर काबूलला जात असतां महाबतखानानें त्याला कैद केलें. नूरजहान आपला बचाव करून पळून गेली. तिनें आपल्या नवऱ्याला सोडविण्याची खूप खटपट केली. पण शेवटीं ती कैदेंतच पतीला जाऊन भेटली.

महाबतखानाच्या हातावर तुरी देऊन जहांगीर व नूरजहान स्वतःची सुटका करून घेऊन पळून गेले. महाबतखान शाहजहानला शरण गेला. परंतु त्यानंतर थोड्याचदिवसांनीं म्हणजे २८ ऑक्टोबर १६२७ या रोजीं जहांगीर मरण पावला. रावी नदीच्या काठीं शाहदरा येथें त्याचा सुंदर मकबरा बांधण्यांत आला.




नेहरू चरित्र

[१३]

शेतकऱ्यांना या चळवळीमुळें आपल्या शक्तीची कल्पना येऊं लागली. किसान महासभा स्थापन झाल्या. त्यांत अनेकदां साठसत्तर हजारपर्यंत शेतकरी हजर रहात. या सभांना हजर होण्यासाठीं ते तिकिटा-शिवाय प्रवास करीत कोणी तिकिट कलेक्टरनें विचारलें तर ते उत्तर देत—"आतां युग पालटलें आहे."

१९२० सालाच्या शेवटीं एक गोष्ट घडली. त्यावेळीं जवाहरलाल नेहरू कलकत्ता कांग्रेसच्या अधिवेशनासाठीं गेले होते. कांहीं आरोप लावून पोलिसांनीं कांहीं शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यांना कैद केलें होतें. प्रतापगढ येथें त्यां-च्यावर खटला चालणार होता. ज्यादिवशीं तो खटला सुरू होणार होता त्या दिवशीं हजारों शेतकरी जमा झाले. तुरुंगापासून कोर्टापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा शेतकरी उभे होते.

मॅजिस्ट्रेट घाबरून गेला. त्यानें खटला दुसऱ्यादिवशीं चालवण्याचें ठरविलें. दुसऱ्या-दिवशीं गर्दी आणखी जास्त जमली. शेवटीं



शेतकऱ्यांच्या पुढाऱ्यांना सोडून द्यावें लागलें. या घटनेमुळें शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढला. परंतु सरकारला ही गोष्ट कशी काय रुचणार ?

सन् १९२१ साली जवाहरलालजी नागपुर कांग्रेसचें अधिवेशन संपल्यावर अलाहाबादला आले तेव्हां रायबरेलीहून त्यांना तार मिळाली कीं स्थिती गंभीर आहे व जवाहरलालजींनीं लवकर निघून यावें.

कांहीं शेतकऱ्यांना रायबरेलीच्या तुरुंगांत टाकण्यांत आलें होतें. प्रतापगढ येथें पुढाऱ्यांना सोडविण्यांत त्यांना जें यश



सन् १९२१ मध्यें फैजाबाद जिल्ह्यांत अत्याचाराचें एक निराळेंच रूप नजरेस आलें. कांहीं शेतकऱ्यांनी एका तालुकेदाराच्या घरांतच लुटालूट केली. नंतर असें कळलें कीं गांधीजींनीं तशी लुटालूट करायला सांगितली आहे अशी एका जमीनदारानें त्यांना चिथावणी दिली होती. लूट चालू असतां "महात्मा गांधींचा जयजयकार" चालू होता. तें ऐकून जवाहरलालजींना मनस्वी राग आला. त्यांनीं फैजाबाद जिल्ह्याच्या अकबराबादच्या भागांत एक सभा केली. त्या सभेला जवळपासच्या खेड्यांतले पांच सहा हजार तरी शेतकरी हजर होते. नेहरूंनीं त्यांना स्पष्ट शब्दांत समजावून सांगितलें कीं अशा तऱ्हेचीं कामें देशाला अपमानकारक अशीं कामें आहेत. ज्यानें कोणी या लुटालुटींत भाग घेतला असेल त्यानें मर्दासारखे पुढें येऊन आपली चूक कबूल करावी. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे २०-२५ लोकांनी पोलीसांच्यासमोर आपला हात वर केला. त्यांना त्या अपराधाबद्दल चांगला दंड झाला.

जवाहरलालजींना जेव्हां कळलें कीं कोणाच्या चिथावणीला बळी पडून शेतकऱ्यांनीं ही चूक केली होती तेव्हां त्यांना फार वाईट वाटलें. सरकारला फावलें या एका चुकीचें उदाहरण देऊन सरकारनें शेतकऱ्यांची चळवळ दाबून टाकायला सुरवात केली. तुरुंग भरले. एका वर्षावर खटले चालू होते. खटला संपण्यापूर्वींच कित्येक लोक तुरुंगांतच मरण पावले. कांहीं जणांना लांब मुदतीच्या शिक्षा झाल्या. जवाहरलालजी स्वत: तुरुंगांत गेले तेव्हां त्यांची त्या गरीब शेतकऱ्यांशीं भेट झाली.






[१४]

दुसऱ्या दिवशीं आयशानें एका नोकराच्या हातीं एक पत्र जगतसिंहाकडे पाठविलें—

"युवराज! तुमच्याजवळ बोलण्याची इच्छा असूनदेखील मी बोलूं शकलें नाहीं. मी भेटलें नाहीं म्हणून तुला राग आला नसावा असें मी मानतें. परंतु मला जें दु:ख वाटलें तें मी कसें तरी मनांतल्या मनांत सहन केलें. तुमच्यावर माझें प्रेम होतें ही गोष्ट तूं विसरावीस ही विनंती करण्यासाठींच मी हें पत्र लिहीत आहें. तुमच्यावर प्रेम करण्याची योग्यता माझ्यांत नाहीं. तुला देण्यालायक माझ्याजवळ जें कांहीं होतें तें मी पूर्वींच तुला देऊन चुकलें आहें. मला त्याबद्दल तुमच्याकडून कांहीं मिळावें याची अपेक्षा मी ठेवली नाहीं. आनंदाच्या वेळीं तूं माझी आठवण काढलीस तर मला पुरें. तूं दु:खांत असशील निदान त्यावेळीं तरी आयशाला आठवायला विसरूं नकोस.

"तूं हा प्रदेश सोडून जात आहेस. पठाणांचा स्वभाव अजून शांत नाहीं. म्हणून कदाचित तुला या प्रदेशांत कदाचित पुन्हां यावें लागेल. तेव्हां तुझी माझी भेट होणार नाहीं. तुझें लग्न ठरलें म्हणजे मला कळव. मी स्वत: त्याला हजर राहीन.



तुझ्या राणीसाठीं उत्तमोत्तम वस्त्राभूषणें तयार करून ठेवीन. संधी मिळाली तर ती वस्त्रें व आभूषणें घालून मी स्वतः तिला सजवीन. मी या जगांत आतां नाहीं हें कळल्यावर तूं या प्रवेशांत यावें अशी माझी विनंती आहे. माझ्या पैशाच्यांत मी तुझ्यासाठीं म्हणून ज्या ज्या वस्तू एकत्र करून ठेवल्या आहेत त्या तूं स्वीकाराव्यास, एवढी माझी हात जोडून विनंती आहे. जास्त काय लिहूं ?"

—आयशा

त्या पत्राचें उत्तर जगतसिंहानें या शब्दांत दिलें—

"आयशा, तूं श्री नारीला स्त्रीजगतच एक भूषण आहेस. तुझ्या पत्राचें उत्तर मी आतांच कांहीं देत नाहीं देऊं शकत नाहीं. याबद्दल मला वाईट पण वाटतें. मला तूं विसरूं नकोस. मी जिवंत असलो तर एका वर्षानें तुला अवश्य पत्र लिहीन."

जगतसिंहानें तें उत्तर लिहून त्याच नोकराच्या हातीं पाठवून दिलें.

मोंगल व पठाण यांची संधी झाल्या-नंतर विरेंद्रसिंहाची पत्नी विमला, मुलगी तिलोत्तमा आणि त्यांच्याबरोबर असलेल्या अभिरामस्वामी व अस्मानींविषयीं कोणालाच कांहीं कळलें नाहीं. त्यांचा शोध लावण्याचा प्रयत्न मानसिंहांनी तर केलाच, उस्मान व ख्वाजा ईसानें देखील केला. परंतु कोणालाच यश आलें नाहीं. शेवटीं मानसिंहानें मंधारण किल्ल्याच्या संरक्षणार्थ एका विश्वास-पात्र सरदाराला नेमलें आणि त्याला सांगून ठेवलें कीं यदाकदाचित विमला व तिलोत्तमा दोघी किंवा दोघी पैकी कोणी एक आली तर त्यांना किल्ल्याच्या किल्ल्या देऊन त्यानें निघून यावें. त्यानंतर मानसिंहांनीं आपली छावणी हलवण्याची तयारी सुरू केली.

दुसऱ्यादिवशीं सैन्य दिल्लीकडे कूच करणार होतें. जगतसिंहानें घोड्याच्या गळ्याला बांधलेलें तें पत्र काढून वाचलें.

"वचनाचें पालन करण्यासाठीं किंवा ब्राह्मणाचा शाप लागूं नये म्हणून तरी हें पत्र मिळतांच पुन्हां येथें यावें. मी एक ब्राह्मण आहे."

तें पत्र वाचून जगतसिंहाला कांहींच उलगडा होईना. यांत शत्रूचाच कांहीं डाव तर नसेल ही शंकादेखील त्याच्या मनांत आल्याशिवाय राहाली नाहीं. तरी त्यानें त्या पडक्या किल्ल्याकडे जाण्याचें ठरविलें. तो आपल्या अनुयायांना म्हणाला— मी वेळेवर पोंचलों नाहीं तर तुम्ही वाट पाहूं नका, पुढें व्हा. मी वाटेंत कोठें तरी येऊन भेटेन."

तो त्या पडक्या किल्ल्यापर्यंत येऊन पोंचला तेव्हां त्याला तेथें ती चिता व कबर यांच्या तशी पहावयास मिळाली. परंतु चितेवर एक दुःखी ब्राह्मण बसलेला दिसला. त्यानें त्याला विचारलें—

"तुम्हींच मला बोलाविलें होतें काय ?" जगतसिंहानें त्या ब्राह्मणाला विचारलें व जवळ जाऊन तो अभिरामस्वामी असल्याचें



ओळखून म्हणाला—"तुम्हीं ? येथें असे कां बसला आहां ? असें घडलें तरी काय ?"

"काय घडलें हें तुला कळावें म्हणून तर मी तुझी वाट पहात बसलों आहें. तिलोत्तमा आपल्या शेवटच्या घटका मोजीत आहे." अभिरामस्वामी म्हणाला.

जगतसिंहाच्या डोळ्यासमोर अनेक गोष्टी शैलेश्वराच्या देवळांत तिला अगदीं प्रथम पाहाल्यापासून तें कैदेंत तिच्याशीं केलेल्या कठोर व्यवहारापर्यंत,—एका मागून एक चित्रासारख्या उभ्या राहाल्या व त्याचें हृदय प्रेमानें उचंबळून आलें.



"विमलानें नवाबाचा खून केल्यावर मी आपली मुलगी व नात यांना बरोबर घेऊन वेष पालटून स्वतःचा व त्यांचा बचाव करीत फिरत होतो. वाटेंत तिलोत्तमा आजारी पडली. तिच्या आजाराचें कारण तुला माहीतच असेल. या आजाराचें औषध कोणा जवळ नाहीं. पांच दिवस झाले, मी येथें बसून आहें. एकदां अचानक तूं इकडे आलेला पाहून तुझ्या घोड्याच्या गळ्यांत ती चिठ्ठी बांधून ठेवली. कारण मला वाटलें कीं तिलोत्तमेच्या जिवाचें कांहीं बरें वाईट झालें तर निदान शेवटच्या घटकेला तरी तुमची दोघांची भेट होईल. तेव्हां तिची तब्येत इतकी बिघडलेली नव्हती, पण आतां तिच्या जगण्याची आशा मला नाहीं. दिवा विझावला वाऱ्याची एक झुळूक पुरेल." असें सांगून अभिरामस्वामी रडूं लागला. जगतसिंहाला पण तें सर्व ऐकून फार वाईट वाटलें."


अभिरामस्वामी हृदय आवरून पुढें म्हणाला—"एकदम तिच्यासमोर तूं गेलास तर त्यांत देखील तिच्या जिवाला धोका आहे. तूं आल्याची बातमी प्रथम मी तिला कळवितों. मग तूं ये." असें सांगून तो त्या पडक्या किल्ल्यांत गेला. थोड्या वेळानें त्यानें जगतसिंहाला बोलविलें.

आंत एका खोलींत पलंगावर तिलोत्तमा डोळे मिटून पडून होती. वैधव्यामुळें दुःखी विमला तिलोत्तमेला त्या स्थितींत पाहून स्वतःच्या जिवाची पर्वा न करून तिलोत्तमे-जवळ बसून हळुवारपणानें तिच्या अंगावर हात फिरवीत होती. जगतसिंह पलंगाजवळ जाऊन उभा राहाला. अभिरामस्वामी जवळ जाऊन हळूच म्हणाला—"जगतसिंह आले आहेत, तिलोत्तमा! तिलोत्तमेनें एकदां डोळे उघडून त्याला पाहिलें व डोळे मिटून तोंड फिरवून पडून राहाली. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. तें पाहून जगतसिंह तिच्या पायगती बसला. त्याच्या डोळ्यां-तूंनपण अश्रुधारा वहात होत्या.

कित्येक दिवस जगतसिंहानें तिची सेवा शुश्रूषा केली. सैन्य कोठंवर गेलें, छावणी काढून सर्व पाटण्यापर्यंत पोंचले कीं नाहीं, कोणी त्याची वाट तर पहात नसेल, या सर्व गोष्टींची फिकीर त्याला नव्हती. जवळ-जवळ वाळून गेलेल्या वेलीला आपल्या आसवांचें पाणी घालून पुन्हां पालवी फुटते का हें पाहण्यासाठीं तो अहोरात्र जागत होता. तिच्या आजाराला एक प्रेमच काय तें औषध होतें. त्या औषधाचा फायदापण झाला व तिची तब्येत बरीच सुधारली. आतां ती पलंगावर उठून बसूं लागली. विमला नसेल त्यावेळीं दोघें परस्परांशीं मोकळेपणानीं बोलूं शकलीं. पाळीपाळीनें दोघांनीं चुकीची माफी मागितली.

एक दिवशीं संध्याकाळीं अभिरामस्वामी पुस्तक वाचीत बसला असतां जगतसिंह त्याच्याजवळ येऊन उभा राहाला. म्हणाला—"मला वाटतें, आतां तिलोत्तमेला प्रवास करायला हरकत नाहीं. आतां या पडक्या





किल्ल्यांत पडून राहण्याचें काय कारण ?" अभिरामस्वामी पुस्तक बंद करून उठून उभा राहिला व त्यानें जगतसिंहाला पितृवात्सल्यानें पोटाशीं धरलें. नंतर अभिरामस्वामींबरोबर जगतसिंह व इतर सर्व मंडळी त्याच्या किल्ल्यांत गेले. तेथें जगतसिंह व तिलोत्तमेचा विवाह समारंभ थाटामाटानें पार पडला. समारंभासाठीं जगतसिंहाचे नातेवाईक व मित्रमंडळी आली होती. तिलोत्तमेची सर्व नातेवाईक मंडळी-पण त्याला हजर होती.

आयशानें त्याला अवश्य बोलावणें पाठवावें असें कळविलेंच होतें. त्याप्रमाणें जगतसिंहानें तिला बोलावणें पाठविलें होतें व ती आपल्या भावाबरोबर आली पण होती. ती अंतःपुरांतच होती. मनांतल्या मनांत तिला काय होत असेल हें तिचें तिलाच ठाऊक. परंतु वरकरणी फार आनंद झाल्याचें तिनें दर्शविलें. तें पाहून सर्वांना आनंद झाला.

विवाहानंतर आयशा तिलोत्तमेचा निरोप घ्यायला गेली तेव्हां तिनें विचारलें-"नवाबनंदिनी! आपल्या लग्नाचें बोलावणें पाठवशील ना मला?" तिला जगतसिंहावर आयशाचें प्रेम होतें ही गोष्ट माहीत नव्हती.

आयशानें कांहीच उत्तर दिलें नाहीं. ती तिलोत्तमेचा हात आपल्या हातांत घेऊन म्हणाली-"ताई! मी येतें बरें का! तूं खरी भाग्यवती आहेस. अल्ला तुला आयुष्यभर सुखी ठेवो."

"पुन्हां आपली भेट केव्हां?" तिलोत्तमेनें विचारलें.

"आपली भेट, पुन्हां! त्या परमेश्वरालाच ठाऊक. पण आपल्या या मोठ्या बहिणीला विसरूं नकोस हं!" आयशा हुंदका आवरून म्हणाली.

"काय म्हणतेस हें? अग तुला मी विसरलें तर युवराज माफ करतील का मला?" तिलोत्तमा स्मित करून म्हणाली.

"हें नाहीं आवडलें मला. युवराजांसमोर माझें नांव कधीं तूं काढलेंस तर माझ्या गळ्याची शपथ. हें वचन कीं कधीं नाहीं काढणार!" आयशा म्हणाली. कारण तिला माहीत होतें कीं तिची आठवण झाल्यास युवराजांचें मन खातीनें दुःखी होईल.

तिलोत्तमेनें मान हलवून तिला वचन दिलें.

परंतु तूं मला विसरतां कामा नये बरें का. मी माझी आठवण म्हणून जें कांहीं देईन तें जपून ठेव. असें सांगून आयशानें दासीला बोलावून एक हस्तीदंती करंडक मागविला. त्यांत कंठहार व आभूषणें होतीं. तिलोत्तमानें तीं सर्व तिलोत्तमेला घातलीं. तिलोत्तमा स्वतः श्रीमंतींत वाढलेली होती. परंतु इतकी सुंदर रत्न भूषणें तिनेंदेखील पूर्वी पाहिली नव्हती. तीं सर्व आभूषणें आयशाला तिच्या बापाकडून मिळालीं होतीं. परंतु तिनें तीं मोडून पुन्हां तिलोत्तमेसाठीं आपल्या आवडीप्रमाणें पुन्हां घडविलीं होतीं.

तिलोत्तमा सर्व रत्नांची प्रशंसा करूं लागलेली पाहून ती म्हणाली "कशाला



एवढी स्तुती! तुझ्या हृदयांत एक रत्न आहे त्याच्यासमोर हीं सर्व फिकीं पडतील." हें बोलत असतां तिच्या नकळत तिच्या डोळ्यांतून दोन थेंबें गळलीं. चटकन तिनें ती पुसून टाकलीं. पण तिला कोणत्या गोष्टीबद्दल वाईट वाटलें, हें तिलोत्तमेला कळलें नाहीं.

आयशानें तिलोत्तमेचे दोन्ही हात आपल्या हातांत घेत डोळे भरून तिचें रूप पाहिलें व मनांतल्या मनांत म्हणाली-"हें रूप पाहाल्यावर माझ्या प्राणेश्वरांना कसलें दुःख होणार?" नंतर ती तिलोत्तमेला

म्हणाली—"बरें तर मी येतें. युवराजांना भेटायला जाऊन त्यांचा वेळ फुकट घाल-विण्याची माझी इच्छा नाहीं. तूं स्वतःला सुखी कर व आपल्या पतीला सुखी ठेव. मी दिलेले दागिने नेहमीं घाल, परंतु आपल्या हृदयांतला दागिना नेहमीं स्वच्छ व पवित्र राख."

हें बोलत असतां आयशानें हुंदका दाबल्याचें तिलोत्तमेच्या लक्षांत आल्या-शिवाय राहिलें नाहीं. तिनें विचारलें देखील—"पण अक्का! तूं अशी दुःखी कां?" तें ऐकून आयशाच्या डोळ्यांतून घळघळां अश्रुधारा वाहूं लागल्या. पण एक क्षणभर देखील जास्त न थांबतां ती पालखींत जाऊन बसली.

आयशा घरीं पोंचली तेव्हां जास्त रात्र उरली नव्हती. कपडे बदलून ती खिडकी-समोर येऊन उभी राहिली. आकाशांत तारे चमकत होते. खालीं खंदकाच्या पाण्यांत आकाशाची पडछाया छान दिसत होती. खिडकींत बसून ती काय विचार करीत होती हें सांगणें कठीण आहे. तिनें बोटांतून एक अंगठी काढली. त्यांत विष होतें, जालिम विष होतें. "हें विष प्याल्यानें माझी तहान कायमची भागेल." तिच्या मनांत एक विचार आला. लगेच दुसरा विचार आला—"एवढ्याचसाठीं का देवानें मला हा देह दिला. हा थोडासा कष्ट सहन करण्याची शक्ति माझ्या अंगांत नसेल तर हा स्त्रीजन्म फुकट. जगतसिंहाला ही गोष्ट कळली तर त्यांच्या हृदयाची दशा काय होईल?" आयशानें ती अंगठी खंदकांत फेंकून दिली. [संपूर्ण]

[पुढील अंकीं नवीन गोष्ट]





निरर्थक त्याग

विक्रमार्कानें आपला हट्ट सोडला नाहीं व पुन्हां झाडाजवळ जाऊन प्रेत खांद्या-वर काढून घेतलें व नेहमींप्रमाणें मौनपणें स्मशानाकडे निघाला. तेव्हां प्रेतांत बसलेला वेताळ त्याला म्हणाला—"राजा! तुझा हा हट्ट अगदीं असामान्य असाच आहे. परंतु तूं विनीतमतीसारखा निरर्थक त्याग करून तूं त्याच्यासारखा कदाचित सर्वस्व घालवून बसशील असें मला वाटत आहे. तुला कंटाळा येऊं नये म्हणून मी त्याची गोष्ट सांगतों. लक्षपूर्वक ऐक." असें सांगून तो गोष्ट सांगूं लागला.

प्राचीन काळीं अहिच्छत्रपुर नांवाच्या गांवीं उदयतुंग नांवाच्या राजाकडे कमलमित्र नांवाचा एक प्रतिहारी रहात असे. त्याच्या सर्व गुणसंपन्न मुलाचें नांव विनीतमति असें होतें.



एके दिवशी दुधासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें. गच्चीवर हिंडत असतां सहज त्याच्या मनांत आलें की इतकें स्वच्छ चांदणें पडलें आहे तेव्हां येथें पडून राहण्यापेक्षां वनश्री पहावयास जावें. म्हणून तो धनुष्यबाण घेऊन रानांत निघाला. थोडें अंतर चालून गेल्यावर त्याला एका झाडाखालीं रडत बसलेली एक मुलगी दिसली.

"कोण ग तूं ? आणि अशी रडत कां आहेस ?" त्यानें तिला विचारलें.

ती म्हणाली—"मी गंधमाली नांवाच्या नागराजाची कन्या आहें. माझें नांव विजयवती. कालजिह्व नांवाच्या यक्षानें माझ्या वडिलांचा युद्धांत पराभव करून त्यांना आपला दास करून घेतलें. तें असह्य झाल्यानें मी गौरीची पूजा करून तिला प्रसन्न करून घेतलें. देवीनें मला एक दिव्य खड्ग व एक पांढरा घोडा दिला व तुला द्यावयाला सांगून तुझ्याकरवीं कालजिह्वाला जिंकणें शक्य आहे व या दिव्य खड्गाच्या साहाय्यानें तुला राज्य संपादन करतां येईल असेंदेखील देवीनें सांगितलें आहे. या वेळीं तुला रानांत आलेला पाहून तुझें लक्ष आपल्याकडे आकर्षित करून घेण्यासाठींच मी रडत होतें. तूं मला एवढी मदत केलीस तर मी तुझे उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं."

विनीतमतीनें ती जबाबदारी स्वतःवर घेण्याचें कबूल केलें. विजयवती कोठें तरी गेली व एका क्षणार्धांत एक शुभ्र पांढरा घोडा व दिव्य खड्ग घेऊन आली. विनीतमतीनें तें दिव्य खड्ग घेतलें, घोड्यावर बसला व विजयवतीला पण त्याच घोड्यावर बसवून घेऊन तो यक्ष रहात असे त्या मानससरोवराकडे निघाला. तो घोडा पापणीदेखील लवली नसेल एवढ्या वेळांत मानससरोवरावर येऊन पोंचला.

यक्ष चक्रवाकाचें रूप घेऊन मानससरोवरावर विहार करीत होते. विजयवतीचा बाप गंधमाली त्यांची सेवा करीत होता. विनीतमतीनें तलवार घेऊन यक्षांवर हल्ला केला. तेव्हां कालजिह्वनें एक भयंकर रूप धारण केलें व विनीतमतीशीं युद्धाला सज्ज झाला. परंतु विनीतमती त्याचे केस धरून तलवारीनें त्याचा वध करूं लागला तेव्हां तो त्याच्याजवळ प्राणभिक्षा मागूं लागला. गंधमालीला दास्यमुक्ति मिळाली आणि तो विनीतमती व आपली मुलगी विजयवती यांच्या बरोबर स्वदेशीं परतला.

विनीतमतीला एक दिव्य खड्ग व अश्व यांच्याबरोबर एक कन्या पण मिळाली. हें पाहून त्याचे वडील कमलमित्र व राजा उदयतुंग यांना फार आनंद झाला.

उदयतुंग याला उदयवती नांवाची एक मुलगी होती. षड्शास्त्र व शोडष कला यांत तिनें प्रावीण्य संपादन केलें होतें. राजानें जाहीर केलें होतें कीं ब्राह्मण किंवा क्षत्रिय कुळांत जन्मलेला जो कोणी राजकन्येला शास्त्रार्थ करून जिंकेल त्याच्याशीं तिचें लग्न करून देण्यांत येईल. विनीतमतीच्या वडिलांनीं आपल्या मुलाला





उदयवतीशी शास्त्रार्थ करून तिला जिंकावें असें सुचविलें. परंतु एका स्त्रीशीं शास्त्रार्थ करून तिला जिंकणें त्याला थोडें विचित्र वाटलें.

कमलमित्र राजाकडे गेला व म्हणाला– "महाराज! माझा मुलगा राजकन्येशीं शास्त्रार्थ करण्यास तयार आहे. तरी त्या-साठीं जरूर ती तयारी करावी. राजा त्या गोष्टीस कबूल झाला. दुसऱ्या दिवशीं विद्वत्-सभा भरली. राजकन्येनें जें जें प्रमेय मांडलें त्या प्रत्येकाचें विनीतमतीनें खंडन केलें. शेवटीं तिनें आपला पराभव स्वीकार करून विनीतमतीला पती म्हणून स्वीकारलें. उदय-तुंगनें थाटामाटानें दोघांचें लग्न करून दिलें.

उदयतुंग वृद्धच होता. त्याला मुलगा नव्हता. म्हणून जांवयालाच राज्य देऊन त्यानें वानप्रस्थाश्रम घेतला व गंगेकाठीं आश्रम स्थापन करून त्यांत राहूं लागला. विनीतमती आपल्या दोघां राण्यांसह राज्य करूं लागला.

कांहीं दिवसांनीं इंद्रकलश नांवाचा एक राजकुमार उत्तरेकडून विनीतमतीच्या भेटीस आला. विनीतमतीनें त्याचें सर्व प्रकारें आतिथ्य करून येण्याचें कारण विचारलें.

तो म्हणाला–" आपण कल्पवृक्षाप्रमाणें कोणी कांहीं मागितलें तर तें देऊन त्याची इच्छापूर्ण करतां असें मी ऐकतों. माझ्या-वडिलांनीं दिलेल्या राज्यावर मी राज्य करीत असतां माझा धाकटा भाऊ कनककलश यानें माझ्या राज्यावर स्वारी केली व माझें सिंहासन बळकावून बसला आहे. आपण आपलें खड्ग व अश्व मला कृपा करून दिल्यास मी आपलें राज्य परत मिळवीन."

विनीतमतीनें लगेच तो दिव्य अश्व व तें खड्ग इंद्रकलशाला दिलें. इंद्रकलशानें त्याच्या साहाय्यानें आपलें राज्य परत मिळविलें. कनककलश आपल्या भावाकडून पराभव झाल्यावर रडत अहिच्छत्रपूरला आला. विनीतमतीच्या राजवाड्यासमोर चिता पेटवून त्यांत उडी मारून आत्महत्येस तयार झाला. तेव्हां विनीतमति त्याच्याजवळ येऊन त्याला म्हणाला–" अशी आत्महत्या कां करून घेतोस? तुला राज्यच पाहिजे ना! माझें राज्य घे! मला मूलबाळ नाहीं. मी तुलाच आपला मुलगा समजून तुला हें राज्य देतों." त्याप्रमाणें त्यानें आपलें राज्य कनक-कलश याला देऊन टाकलें आणि आपल्या दोघी राण्यांसह त्यानें वनवास ग्रहण केला.

येथवर गोष्ट सांगून वेताळ म्हणाला– "राजा! मला एका गोष्टीची शंका आहे. विनीतमतीच्या या विचित्रपणाचा अर्थ काय? तो स्वतः राजा होता. त्यानें एका अपरिचित व्यक्तीला तें दिव्य खड्ग व अश्व कां दिलें व पुढें कनककलश आत्महत्येला तयार झाला तेव्हां त्याला स्वतःचें राज्य कां देऊन टाकलें? विनीतमतीच्या वाड्यासमोर चिता रचून आत्महत्येचा विचार कनककलश यानें कां केला? तूं या शंकांचें समाधानकारक उत्तर माहीत असून दिलें नाहींस तर त्याचा परिणाम तुला माहीतच आहे, तुझ्या डोक्याचीं




शंभर तुकडे होऊन तुझ्याच पायांवर लोळू लागतील."

त्यावर विक्रमार्क म्हणाला "विनीतमतीनें केलें त्यांत गैर असें कांहींच नव्हतें. त्याच्या मनांत राज्याचा मोह कधींच उत्पन्न झाला नाहीं. ज्या कामासाठीं विजयवर्मानें त्याला तें खड्ग व अश्व दिले होते तें काम पुरें करण्यासाठींच त्यानें त्याचा उपयोग केला. राजाला मूल नव्हतें व राजकन्येला शास्त्रार्थ करून जिंकणें त्याला कठीण नव्हतें. तरी स्वतः होऊन शास्त्रार्थ करण्याचा विचार त्याच्या मनांत आला नाहीं. बापाच्या आग्रहानेंच तो शास्त्रार्थ करण्यास कबूल झाला. राजा झाल्यावर आपलें राज्य वाढविण्याचा विचार देखील त्याच्या मनांत कधीं आला नाहीं. या सर्व गोष्टींवरून त्याच्या मनांत राज्याचा मोह नव्हता हें स्पष्ट होतें. म्हणून त्यानें इंद्रकलश याला खड्ग व अश्व दोन्ही देऊन टाकले यांत नवल काय? विनीतमतीनें केलेल्या साहाय्यामुळेंच भावाच्या हातून आपला पराभव झाला असें कनककलशाला वाटलें तर त्यांत तरी नवल काय? विनीतमतीनें स्वतः स्वारी करून त्याला जिंकलें असतें तर कनककलशाला एवढें वाईट वाटलें नसतें. तिन्ही भावांनी मदत घेऊन भावानें त्याचा पराभव केलेला कनककलशाला सहन झालें नाहीं. कनककलशाच्या आत्महत्येला मूळ कारण आपण आहों हें विनीतमतीला माहीत होतें. म्हणून त्यानें स्वतःचें राज्य देऊन कनककलशाची राज्य मिळविण्याची इच्छा पुरी केली."

अशा प्रकारें राजाचें मौन भंग होतांच वेताळ प्रेतासह अदृश्य झाला व पुन्हां झाडाच्या फांदीला धरून लोंबकळूं लागला.

[कल्पित]



जयसेन नांवाच्या राजाला धनंजय नांवाचा मुलगा होता. त्यानें संपूर्ण शस्त्रविद्या शिकून घेतल्या. पण धनुर्विद्येंत त्यानें विशेष प्राविण्य संपादन केलें होतें. तो मोठा झाल्यावर त्याच्या वडिलांनीं त्याला युवराज पद देण्याचें ठरवून त्यासाठीं एक समारंभ करण्याचें ठरविलें. परंतु धनंजयाला कांहीं काळ स्वतंत्रपणें राहून जगाचा प्रवास करण्याची इच्छा होती. आईवडिलांना तो आपण आवडलें नाहीं कारण तो त्यांचा एकुलता एक मुलगा होता. म्हणून धनंजय कोणाला कळविल्याशिवाय परदेशीं निघून गेला. आईवडिलांनीं मुलाचा पुष्कळ शोध केला. परंतु त्यांना त्यांत यश आलें नाहीं. मुलाचा विरह असह्य झाल्यानें रात्रंदिवस रडून राणी आंधळी झाली. आतां धनंजय परत येणें अशक्य असें वाटून सर्व निराश झाले.

राजानें आपल्या आंधळ्या राणीला टाकलें व दुसरें लग्न करून घेतलें. त्यानें मोठ्या राणीसाठीं रानांत एक वाडा बांधून त्यांत तिला ठेवलें. पुढें कांहीं दिवसांनीं धाकट्या राणीला एक मुलगा झाला. राजाला अपत्यप्रेम पुन्हां लाभलें व तो त्या आनंदांत मोठ्या मुलाला पार विसरून गेला.

धाकट्या राणीच्या मुलाला पांचवें वर्ष लागलें तेव्हां धनंजय स्वदेशीं परत आला. त्यानें भ्रमण करीत असतां अनेक देश जिंकले व कीर्ति संपादन केली. स्वदेशीं परत येण्यापूर्वीं त्यानें राजाला कळविलें नव्हतें. परंतु प्रजेच्या तोंडीं राजाला कळलें कीं कोणीतरी शूर मनाधान देश जिंकीत

श्री का ना बडे





त्याच्या राज्यावर स्वारी करण्यासाठी आला आहे व त्याने राजधानीबाहेर तळ दिला आहे.

ती बातमी ऐकून राजा घाबरून गेला. त्याने आपल्या मंत्र्याला धनंजयाकडे पाठविले. मंत्र्याने युवराजाला ओळखले नाही. तो त्याला म्हणाला, "महाराज! आपणांशी युद्ध करण्याची आमच्या महाराजांची इच्छा नाही. दोन हजार सुवर्ण मुद्रा स्वीकारून आपण आमच्या राजधानीवर स्वारी करण्याचा विचार सोडावा अशी आमच्या महाराजांची आपणांजवळ विनंती आहे."

धनंजय स्मित करून म्हणाला, "मी किल्ल्यात प्रवेश करणार आहे. मी या देशाचा युवराज आहे. तुला कळत नाही का, मंत्री?"

युवराजाला ओळखून मंत्री लाजून गेला. त्याने युवराज निघून गेल्यानंतर घडलेले सर्व वृत्त वर्णन केले व म्हणाला, "तुमच्या राणी सरकार रानात एका झोपडीत राहत आहेत. पुत्रवियोगाने रडत राहिल्याने त्यांचे डोळे गेले." हे ऐकून धनंजयाला फार वाईट वाटले व तो राजधानीत न जाता आपल्या आईला भेटण्यासाठी रानात गेला. मुलाचा आवाज ऐकून आईच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले व तिला पुन्हा दिसू लागले.

तिकडे मंत्र्याने धनंजय परत आल्याची गोष्ट राजाला जाऊन सांगितली. धनंजय घरी न येता सरळ रानात आपल्या आईला भेटण्यासाठी गेल्याचे ऐकून राजाला काय करावे हे सुचेना. तरी राजाने आपल्या मुलाकडे निरोप पाठवून त्याला राजधानीत बोलावले. पण धनंजयाने उलट उत्तर पाठविले की आई रानात असता मी राजधानीत येणे अशक्य. तर मग आईबरोबर यावे असे राजाने कळविले. परन्तु राणीने नकार दिला.


धनंजय आईची परवानगी घेऊन एकटा आपले वडील राजसेन यांच्या भेटीसाठी राजधानीत आला. युवराज परत आल्याची बातमी ऐकून प्रजेला अपरंपार आनंद झाला. जागोजागी तोरणे व ध्वज लावले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला युवराजाच्या दर्शनासाठी प्रजेची एकच दाटी. युवराजाने दरबारात प्रवेश करताच दरबाऱ्यांनी उठून मुजरा केला व राजा आपल्या डोक्यावरचा मुकुट काढून मुलाच्या डोक्यावर ठेवीत म्हणाला, "युवराज, आज पासून तूच या देशाचा राजा."

त्यानंतर धनंजय आपल्या सावत्र आईला भेटण्यासाठी तिच्या महालात गेला. त्या महालात पूर्वी त्याची आई राहात होती. त्या महालात ती राहते हे त्याला राजाकडून कळले. धनंजय त्या महालाकडे जात असता त्याला वाटेत एक मुलगा धनुष्यबाण घेऊन खेळत असलेला दिसला. त्याच्या हातात चार बाण होते.

धनंजय त्या मुलाच्या हातातले बाण घेऊन म्हणाला, "बाळ! हे तुझे धनुष्य. तुला मी दाखवितो कसे बाण मारतात ते." असे सांगून धनंजयाने चार बाण चार दिशांना सोडले.

हे पाहून मुलगा आपले बाण परत मागू लागला. परंतु धनंजयाने तर ते सोडले होते. मुलगा रडू लागला. तेव्हा त्याची आई धावत बाहेर आली व त्याला उगा करीत विचारू लागली, "बाळा काय झाले रडायला?"

मुलगा धनंजयकडे बोट दाखवून म्हणाला, "हा पहा, कोण आला आहे तो. याने माझे बाण सोडले आणि आता मला ते परत पाहिजेत."



तेव्हा धाकटी राणी म्हणाली "मुलाच्या नशिबाचा तूं आणि मी असा काय विचारणार आपल्याला."

धनंजयच्या उंचा उंचा खिडीला बाण मारत होते त्या दिशेला बाण शोधून आणण्यासाठी नोकर धावले. खूपवर शोध केला तरी ते बाण त्यांना सापडले नाहीत.

धाकट्या राणीच्या महालात चालू असलेली गडबड राजाच्या कानावर गेली. ते त्यांनी येऊन कारण विचारलं. तेव्हा ती म्हणाली "थोरल्या मुलाने आपल्या धाकट्या भावाच्या हातातले बाण घेऊन दूर फेकून दिले. म्हणून मुलगा रडतो आहे."

"मोठा मुलगा तरी तुझाच असें नका का मानायला? तोच युवराज आहे. ते बाण मूळ त्याचेच" राजा म्हणाला.

"कळलें मला सर्व, तुम्ही व तुमचा मुलगा दोघे एक होऊन आता माझ्या मुलाचा जीव घ्यायला तयार झालेले दिसता."

"मी तुला दुसरे बाण करून देतो." धनंजयनें आपल्या धाकट्या भावाची समजूत घालण्याचा यत्न करून पाहिला. त्याप्रमाणें त्यानें नवे बाण करून देण्यास नोकरांना सांगितलेंदेखील. नंतर तो वाडेलाचा निरोप घेऊन आपल्या आईकडे परत आला.


धनंजय परत आल्यापासून धाकट्या राणीचा अधिकार कमी झाला व तिच्या मुलाचें कोडकौतुक पण कमी होऊं लागलें. धनंजय तिच्या डोळ्यांत सलू लागला व तिनें त्याचा काटा दूर करण्यासाठी उपाय सुरू केले. तिनें राजवैद्याला बोलावून त्यांना [illegible] लोभ दाखविला व औषधांत विष कालवून मोठ्या मुलाला द्यायला सांगितलं.

राजवैद्य म्हणाले "जो आजारी नाही त्याला औषध देण्याला काय अर्थ? पण आपण स्वतः आजारी पडल्याचें सोंग केल्यास आपल्यासाठी औषध आणण्याचें काम युवराजाला देऊन त्याचा काटा दूर होणें शक्य आहे." वैद्याच्या सल्ल्याप्रमाणें धाकटी राणी आजारी पडली व डोकें दुखीचें सोंग करून कण्हूं लागली व रडूं लागली. राजानें इलाज करण्यासाठी राजवैद्यांना बोलावलं.

वैद्य राणीची नाडी पाहून म्हणाले "महाराज! हा एक तऱ्हेचा शिरोरोग आहे. वायूचा प्रकोप झाल्यानें डोकेदुखी होते. याला औषध म्हणजे सोन्या हिऱ्याचें भस्म. परंतु ते फक्त रत्नद्वीपात मिळतात. कोणी जाऊन आणले तर त्यांचें भस्म काढून राणी सरकारांना देता येईल."


राजा धनंजयला म्हणाला "रत्नद्वीपात जाऊन तूं तेथील हिरे आणतोस काय? नाहीतर मी जातो."

"तुम्ही कशाला? मी जाऊन घेऊन येतो." धनंजय निघाला. रत्नद्वीप दक्षिणेकडे समुद्रांत एक द्वीप होतं. तेथें शेपटाच्या कानांच्या राजाचें राज्य होतें. धनंजय रत्नद्वीपाच्या राजधानीत पोचला तेव्हा त्याच्या ध्वजस्तंभात एक बाण दिसला. धनंजय ने



"ये" म्हणताच बाण ध्वजस्तंभातून निघून सरळ त्याच्या हातात आला. ते पाहून ध्वजस्तंभाच्या आसपास उभे असलेले सैनिक चकित झाले व धनंजयाला तेथून त्यांच्या राजाकडे घेऊन गेले. राजानें धनंजयला त्याचें नांव गाव विचारलें.

"आमचा देश येथून दूर शंभर कोसावर उत्तरेकडे आहे. माझें नांव धनंजय." बाणावर त्याचें नांव वाचून राजाला त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला. शंभर कोसावरचें लक्ष्य वेधणारा असा जावई मिळाला तर आपली मुलगी सुखी होईल असा विचार



करून राजाने त्याच्याशी आपल्या मुलीचें लग्न करून दिले.

लग्न झाल्यावर धनंजयनें आपल्या बायकोला रत्नद्वीपांत येण्याचें खरें कारण सांगितलें "हिरे या द्वीपाच्या एका डोंगरांत सांपडतात. आमचे पोपट नोकर ते वेंचून येतात. मी तुम्हाला पाहिजे तितके हिरे आणवून देतें" असें सांगून पोपटराजाच्या राजकन्येनें एक पोतें भरून हिरे आणवून दिले. धनंजय ते हिरे घेऊन सवतीक स्वदेशीं आला.

अशाप्रकारें धाकट्या राणीची ही युक्ति फुकट गेली. काही दिवसांनंतर तिने पुन्हा डोकेदुखीचें सोंग केलें. वैद्यांनीं तिला नाडी पाहून वायूचा प्रकोप पुन्हा झाला असल्याचें सांगितलें व म्हणाले, "रेशमाच्या भस्मानें रोग कांहीं काळ बरा झाला, परंतु पुरा बरा झाला नाही. तेव्हा या रोगाला एकच एक औषध म्हणजे राक्षस रेशमाचें भस्म. तें रेशम पूर्वेकडील द्वीपांत मिळतें."


धनंजय राक्षस रेशम आणण्यासाठी निघाला. त्या द्वीपाच्या धक्क्यावर देखील एक बाण रुतलेला होता. धनें वाकवतांच बाण त्याच्या हातांत आला. पाहाण्यासाठी तेथें असलेल्या सैनिकांनीं तें बघून त्या हाड्यांनी पाहून आपल्या राजाला त्याची वर्दी दिली. राजानें त्याला बोलावून त्याचें नांव गांव विचारलें. त्या बाणावर धनंजयाचें नांव होतें. राक्षस द्वीपाच्या राजानें धनंजयाचा तो पराक्रम पाहून त्याच्याशीं आपल्या मुलीचें लग्न करून दिलें. लग्न झाल्यावर धनंजयनें आपल्या बायकोला त्या द्वीपात येण्याचें खरें कारण सांगितलें.

"माझ्याकडे काहीं राक्षस नोकर आहेत. त्यांना मी जंबुद्वीपात पाठवीन. त्या द्वीपांतच तुम्हांला हवें असलेलें रेशम मिळतें. तुम्हांला जितकी हवें असेल तें सांगा. मी रेशम घेऊन यायला त्यांना पाठवितें" राजकन्या म्हणाली.

धनंजयानें हवें तितकें राक्षस रेशम मागवून घेतलें व सपत्नीक स्वदेशी आला. त्याच्या बरोबर काहीं राक्षस दास पण आले. त्या राक्षसांना पाहताच धाकट्या राणीची डोकेदुखी बंद झाली. वैद्यांनी तें राक्षस रेशम जाळून त्याचें भस्म तयार केलें व राणीला दिलें.


त्यानंतर काहीं दिवसांनी पुन्हा राणीचें डोकें दुखूं लागलें. वैद्यांनी राणीची नाडी पाहून या रुग्णास आणखी एक औषध सांगितलें. म्हणाले, "राक्षस रेशमानें रोग पुष्कळ बरा झाला असला तरी पुरा बरा झाला नाही. वाघिणीचें दूध मिळाल्यास डोकेदुखी कायमची बरी होईल."

वाघिणीचें दूध आणण्यासाठी धनंजय दक्षिणेकडे निघाला. तेथें व्याघ्रराजाचें राज्य होतें. त्या देशांत वाघांच्या वाघिणी पुष्कळ होत्या. त्यांचें दूध काढणें म्हणजे थट्टा नव्हे. तरी धनंजय व्याघ्रराजाच्या राज्यांत शिरला. तो व्याघ्रराजाच्या राजधानींत पोंचला तेव्हा धक्क्यावरील खांबाला रुतलेला एक बाण त्याला दिसला. धनें वाकवल्याबरोबर बाण त्याच्या हातांत आला.



व्याघ्रराजानें त्याला बोलावून चवकशी केली तेव्हा बाणावर त्याचेंच नांव पाहून त्यानें आपल्या मुलीचें त्याच्याशीं लग्न करून दिलें. लग्न झाल्यावर धनंजयनें व्याघ्रराजाच्या देशांत येण्याचें खरें कारण सांगितलें.

"माझ्याकडे कित्येक वाघ नोकरीला आहेत. त्यांत काहीं वाघिणीपण आहेत. काहीं नुकत्याच व्यालेल्या आहेत. त्यांचें दूध काढून मी तुम्हाला देईन. परंतु बाटेंत दूध नासेल म्हणून पलाम वाघिणीला घेऊन जाऊ या. पाहिजे तितकें दूध मिळेल.



त्याप्रमाणे धनंजय सर्पलोक पन्नास वाघिणींना पकडून म्हशी परतला. त्या वाघिणींना पाहून लोक धावत गेले. धाकटी राणी इतकी घाबरून गेली की मरता मरता वाचली. वाघिणीचे दूध तिला देण्यात आले. वैद्यांनी राणीचा रोग बरा झाला असल्याचे सांगितले.

धाकट्या राणीने वैद्यांना बोलावून विचारले 'आता काय करायचे?' धनंजय मृत्यूच्या तोंडातून तीनदा वाचून आला. त्याला अशक्य असे काही तरी काम सांगा की नाही ते काम त्याला करतां आले नाही तर राजा त्याच्यावर रागावेल."

वैद्य म्हणाले—"राणी सरकारांनी पुन्हा डोके दुखत असल्याचे सोंग करावे. महाराजांना जे सांगावयाचे ते आम्ही पाहून घेऊ." त्याप्रमाणे राणीने पुन्हा डोकेदुखीचे [illegible] केले.

राजाने पुन्हा वैद्यांना बोलावून औषधोपचार करायला सांगितले. "तुम्ही तीनदा तीन प्रकारची औषधे मागितली. ती औषधे दिली. पण राणीची डोकेदुखी बंद झाली नाही. या खेपेस तुम्ही औषध बरोबर सांगितले नाहीत तर तुम्हाला कैदेत टाकावे लागेल." राजा म्हणाला.

"महाराज, या डोकेदुखीला एक रामबाण औषध आहे, परंतु ते करणे अशक्य आहे असे समजून आजवर आम्ही बोललो नाही." वैद्य म्हणाले.

"अशक्य की शक्य ते मी पाहून घेईन. प्रथम औषध काय आहे ते सांगाल की नाही?" राजाने विचारले.

"नवीन खणलेल्या तलावांत राणी सरकारांनी स्नान केले तर ही डोकेदुखी कायमची दूर होईल. तो तलाव आपल्या राजधानीतल्या मोठ्या पटांगणाएवढा असला पाहिजे व त्यात [illegible] पाहिजे." वैद्य म्हणाले.

"नवीन तलाव खणायलाच एक वर्ष लागणार आहे. [illegible] हे सर्व अशक्य [illegible]"

"महाराज, [illegible] म्हणजे एका महिन्याच्या आत औषधोपचार झाला नाही तर राणी सरकारांच्या जिवाला काही तरी वाईट होईल" [illegible] वैद्य म्हणाले.

वैद्य निघून गेले व राजा काळजीत पडला. त्याने धनंजयला बोलावून राणीच्या आजाराची गोष्ट सांगितली व म्हणाला "नीट विचार करून मग, काय करावे व कसे करावे."

धनंजय म्हणाला "महाराज, आपण काळजी करू नये. एका महिन्यात [illegible] काही तरी उपाय करतो." असे सांगून तो पश्चिमेकडे निघाला. वाटेत कोठे तरी नुकताच खणलेला तलाव लाभेल असा विचार करून आणि इतर तीन दिशेला ना[illegible]



[illegible]ला होता व वाटेत त्याला एक तलाव [illegible] म्हणून तो पश्चिमेकडेच निघाला. त्याला वाटेत कोठेच तलाव लागला नाही. पण गजराजाचे राज्य लागले. राजधानीत प्रवेश करताच त्याला [illegible] बाण दिसला. त्याने [illegible] तो बाण त्याच्या हातात आला.

गजराजाने त्याचे नाव गाव विचारून त्याच्याशी आपल्या एकुलत्या एका मुलीचे लग्न करून दिले. लग्न झाल्यावर धनंजयने गजराजाच्या देशात येण्याचे खरे कारण आपल्या बायकोला सांगितले.


"त्यांत काय ? माझ्याकडे कित्येक हत्ती नोकरीला आहेत. त्यांच्याकडून मी हें काम एका दिवसांत पुरें करून घेईन." राजकन्या म्हणाली. तिची आज्ञा ऐकून हत्तिणींनीं धनंजयच्या गांवीं एक तलाव खणून त्यांत पाणी भरलें व मोठमोठीं झाडें मुळासकट उपटून त्या तलावाच्या काठीं आणून लावलीं. त्यांनीं पुष्कळसे मासे देखील पाण्यांत आणून सोडले.

अशा तऱ्हेनें तलाव तयार झाल्यावर धनंजय सपत्नीक स्वदेशीं आला तेव्हां त्याला तो तलाव दिसला. राजाला फार आनंद झाला. तो वैद्यांना म्हणाला— "राणीला या तलावांत स्नान घालून तिचा औषधोपचार करावा. या खेपेस तिची टोमेंदुखी थांबली नाहीं तर तुम्हांला जन्म-ठेप शिक्षा होईल."

धाकटी राणी आघोळ करण्यासाठीं तलावावर गेली. परंतु पाण्यांत पाय टाकल्या- ती पाण्यांत बुडाली. पाणी खोल होतं. हें तिला माहीत नव्हतें. तिला वाटलें क- आंत जाऊं तसें पाणी जास्त खोल होत जाईल. पण तिचा अंदाज चुकला. दुसऱ्या दिवशीं तिचें प्रेत पाण्यावर तरंगत असलेलें सर्वांना दिसलें.

राजा शोक करूं लागला तेव्हा दासींनीं वैद्यांच्या साहाय्यानें युवराजाचा वध व्हावा म्हणून राणीनें केलेल्या का- स्थानाची गोष्ट सांगितली. राजानें वैद्यांना जन्मठेप शिक्षा दिली आणि आपल्या थोरल्या राणीला परत राजवाड्यांत घेऊन आला. त्यानें धाकट्या मुलास राज्याचा एक वांटा दिला व बाकी राज्य आपल्या थोरल्या मुलाला दिलें.





ठिंठाकराळ

उज्जैन नगरी ठिंठाकराळ नांवाचा एक विक्षिप्त मनुष्य रहात असे. तो दिवसभर जुगार खेळे. जिंकणारे लोक त्याला प्रत्येकी अर्धा कवड्या देत. तेवढ्या कवड्या घेऊन तो बाजारात जाऊन कणीक विकत घेई व जागा मिळेल तिथे बसून पोळ्या करून त्या स्मशानात घेऊन जाई व चितेच्या विस्तवावर त्या पोळ्या शेकून घेऊन महाकालाच्या देवळात घेऊन जाई. तेथें देवासमोर तेवत असलेल्या दिव्यातले तूप काढून घेऊन ते आपल्या पोळ्यांना लावून घेई व पोळ्या खाऊन तो देवळांतच पडून राही.

एकदा ठिंठाकराळ देवळांत लोळत असतां देवळाच्या भिंतीवर कोरलेल्या मूर्ती हात हलविल्याचा भास झाला. त्या यक्षाच्या मूर्ती होत्या. त्या मूर्तींना जुगार खेळायला बोलवावें, पुष्कळ फायदा होईल असें त्याला वाटलें. तो विचार मनांत येतांच तो त्या यक्षमूर्तींना म्हणाला—"यक्ष हो ! या खेळायला माझ्याबरोबर. जो जिंकेल त्याला लगेच नगद रुपये द्यावे लागतील."

यक्षांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. जुगार खेळणारांचा एक नियम असतो. खेळणारा पण लावून फासे फेकू लागला की आम्ही खेळत नाहीं असे म्हटलें तर तें मान्य होतें नाहीं तर पुढचा मनुष्य खेळत आहे असें मान्य करावें लागतें. ठिंठाकराळनें पण लावून फासे फेकले होते. देवांनीं त्याला अडविलें नाहीं. ठिंठाकराळ बराच वेळ जुगार खेळत राहिला. त्यानें देवांच्या हातचें बरेंच सोनें जिंकलें.



शेवटीं तो म्हणाला "मी जिंकलेलें सोनें मला देऊन टाका." त्याचें उत्तर यक्षांच्या मूर्तींनीं दिलें नाहीं. जुगारींत हारल्यावर जुगाऱ्यानें हारलेली वस्तु दिली नाहीं म्हणजे त्याला करवतीनें कापून काढावें असा देसीक जुगाऱ्यांचा एक नियम आहे. त्याप्रमाणें ठिठाकराळनें यक्षमूर्ती चिरून काढण्यासाठीं करवत घेतली. ती पाहून यक्ष घाबरून गेले व ठिठाकराळला त्यांच्याकडून जें सोनें मिळणार होतें तें त्यांनीं देऊन टाकलें.

त्यानंतर ठिठाकराळ दर रोज रात्रीं जुगार खेळून यक्षमूर्तींकडून सोनें मिळवू लागला. तें पाहून चामुंडी त्यांना म्हणाली - "त्यानें तुम्हाला खेळायला बोलाविलें म्हणजे सांगा, आम्हाला नाहीं खेळायचं म्हणजे तुमचा खेळाशीं कांहीं संबंध येणार नाहीं."

रात्रीं ठिठाकराळनें बोलावल्यावर सर्व यक्षमूर्ती म्हणाल्या "आम्हांला नाहीं खेळायचें." ठिठाकराळचा डाव फसला तो सरळ महाकालाकडे गेला त्यानें त्यालाच खेळायला बोलावलें.

"मी नाहीं खेळत" महाकाल म्हणाला. तेव्हां ठिठाकराळनें देवाचे पाय धरले आणि म्हणाला "देवा माझें भाग्य माझ्या विरुद्ध फिरलेलें दिसतें आहे. तूं त्रिलोकाचा भार आपल्या शिरावर वाहतोस. माझा भार तुला जड वाटूं लागला का?"

"तुला भिण्याचें कांहीं कारण नाहीं तूं येथेंच रहा." महाकाल म्हणाला. त्या दिवसापासून ठिठाकराळ तेथेंच राहूं लागला.

एके दिवशीं रात्रीं भैरव त्याला म्हणाला - "हें बघ, कांहीं अप्सरा आल्या आहेत महाकाली तीर्थांत स्नानाला. त्यांनीं वस्त्रें काठावर ठेवली आहेत. तीं तूं उचलून घेऊन ये. त्यांच्यांत कलावती नांवाची एक अप्सरा आहे. ती तुझ्याशीं [illegible] तयार होईपर्यंत तूं त्यांचीं वस्त्रें देऊं नकोस."

ठिठाकराळनें त्याप्रमाणें केलें. कलावती लग्न करायला कबूल होईपर्यंत तीं वस्त्रें परत द्यायला तयार नाहीं असें ठिठाकराळनें सांगितल्यावर इतर अप्सरांनीं होकार दिला. कलावतीला इंद्राचा शाप होता. एकदा ती म्हणाली होती "स्वर्गांत सुखाला तोटा नाहीं, पण मर्त्यलोकांत जें सुख आहे तें स्वर्गांत दुर्लभ." त्यावर इंद्राला राग आला व त्यानें शाप दिला "तर मग मर्त्यलोकांतल्या मनुष्याशीं लग्न करून तूं त्या सुखाचा अनुभव घे." त्या शापामुळें कलावती ठिठाकराळशीं लग्नाला तयार झाली व त्याचीशी लग्न केलें. ती दिवसभर स्वर्गांत वास करी व रात्रीं मर्त्यलोकांत पतीकडे येई. एकदां कलावती आपल्या पतीला म्हणाली—"उद्यां इंद्रासमोर रंभेचें नृत्य आहे तें संपेपर्यंत आम्हा सर्वांना तेथें रहावें लागेल. म्हणून मी थोडीशी उशिरां येईन."

"तें नृत्य मलादेखील पहावेंसें वाटत आहे. तूं मला गुप्तपणें तेथें घेऊन चल." ठिठाकराळ बायकोला म्हणाला.



"नको बाई ! इंद्राला हें कळलें तर दोघांना शिक्षा होईल." कलावती म्हणाली तरी त्यानें गोडगोड बोलून अखेर वेडया बायको तिचें मन वळवून घेतलें.

उजाडल्यावर ती स्वर्गलोकीं निघाली तेव्हां तिनें कानांतल्या फुलांत ठिंगाकराळला सूक्ष्मरूपानें लपवून बसविलें. ठिंगाकराळला पायघोळच्या मदतीनें इंद्राच्या खास महालांत प्रवेश मिळाला. इंद्राच्या दरबारांत अप्सरा गाणें म्हणत होत्या व रंभा नाचत होती. नारद व तुंबरू पण तेथें होते. त्यांत एक बकरी नाचत असलेली दिसली त्या बकरीला त्यानें उज्जैन नगरींत पुष्कळदा पाहिलें होतें. ती इंद्रपुरीला कशी आली हें त्याला कळलें नाहीं. त्याला वाटलें कीं ती सर्व माया असावी. परंतु ती बकरी देवलोकांतलीच एक देवी होती.


इंद्राची सभा संपल्यावर कलावती आपल्या नवऱ्याला घेऊन भूलोकीं परत आली दुसऱ्या दिवशीं ठिंगाकराळ याला ती बकरी उज्जैन नगरीं दिसली त्यानें तिला अडवून विचारलें "काल इंद्राच्या दरबारांत तूंच नृत्य केलें होतेंस नाहीं का ? तें नृत्य माझ्यासमोर करून दाखव."

मृत्युलोकांतल्या या माणसाला आपलें हें गुपित कसें काय कळलें ? बकरीला या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. बकरी त्याच्या आज्ञेप्रमाणें नाचली नाहीं तेव्हां ठिंगाकराळनें तिच्या मुस्कटांत जोरानें भडकावली. तिच्या तोंडांतून एक दांत पडला. ती धांवत इंद्राकडे गेली व आपलें गाऱ्हाणें निवेदन केलें. इंद्र कलावतीला रागावून म्हणाला—"तूं मर्त्यलोकांतून आपल्या नवऱ्याला स्वर्गलोकीं माझ्या परवानगी शिवाय घेऊन आलीस म्हणून तुला मी नागपुरात नरसिंहाचें जें देऊळ बांधत आहेत त्याच्या ध्वजस्तंभावर जाऊन रहा अशी शिक्षा देतो."

कलावती व तिची आई अशा दोघींनीं इंद्राचे पाय धरून माफी मागितली व तो शाप परत घेण्यास विनंति केली. तेव्हां इंद्र म्हणाला—"मी जो शाप दिला तो परत घेणें मला शक्य नाहीं. परंतु मी शापमुक्ति कशी होईल हें सांगून ठेवतों. तें देऊळ पडल्यावर तुला शापमुक्ति मिळेल."

कलावती आपल्या नवऱ्याकडे गेली व इंद्रानें दिलेल्या शापाची गोष्ट सांगितली व तिच्या अंगावर जीं दिव्यवस्त्रें व आभूषणें होतीं तीं पतीला देऊन शापाचें फळ भोगण्यासाठीं नागपूरला जाऊन नरसिंहाच्या देवळांतल्या ध्वजस्तंभांत शिरून बसली.

ठिंगाकराळ पत्नीवियोगानें फार दुःखी झाला. तो सावधपणें न वागल्यामुळें त्याच्या पत्नीला कष्ट सहन करावे लागले, त्याला फार वाईट वाटलें. परंतु दुःख करीत बसण्यांत अर्थ नाहीं, होईल त्या तऱ्हेनें कलावतीला शापमुक्त केलें पाहिजे, असें मनाशीं ठरवून त्यानें त्यासाठीं मुनिवेष धारण केला आणि नागपुरास गेला. त्यानें गांवाच्या वेशीवर चार डोंगावर रानांत



कलावतीनें दिलेल्या रत्नाभूषणांचे चार कलश घडवून ते पुरले व पांचवा मध्यरात्रीच्या सुमारास देवळासमोर पुरला. त्या नंतर नदीकाठीं एक आश्रम बांधून तेथें एका झाडाखालीं बसून तपश्चर्या करूं लागला. गांवांतील लोक त्याची तपश्चर्या पाहून त्याला एक मोठा तपस्वी मानूं लागले. ही बातमी राजाच्या कानावर गेली. राजानें त्याला बोलाविलें. परंतु ठिठाकराळ राजाच्या भेटीस गेला नाहीं. तेव्हां राजा स्वतः त्याच्या दर्शनासाठीं आला. संध्याकाळपर्यंत दोघे बोलत होते. राजा राजधानीकडे निघाला तेव्हां कोल्हेकुई सुरू झाली. तो ऐकून ठिठाकराळ हसला. राजानें हंसण्याचें कारण विचारलें तेव्हां तो म्हणाला—"त्याच्याशीं तुझा कांहीं संबंध नाहीं." परंतु राजानें हंसण्याचें कारण सांगावें असा आग्रह केला.

"कारण कांहीं नाहीं. पूर्वेकडे रानांत रत्नाभूषणांनीं भरलेला एक कलश आहे. या कोल्हेकुईचा अर्थ एवढाच कीं मी तो उचलून न्यावा. मला कोल्ह्यांची भाषा कळते." तपस्वी म्हणाला.

तपस्वी म्हणतो तें खरें आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं राजानें त्याला बरोबर



दाखवायला सांगितलें. ठिठाकराळनें जागा दाखविली. तेथें खणल्यावर कलश सांपडला. ठिठाकराळनें त्यांतलीं रत्नें राजाला देऊन टाकलीं. राजाचा तपस्वी वेषांतल्या ठिठाकराळवर विश्वास बसला. ठिठाकराळच्या दर्शनास राजा रोज जाऊं लागला. ठिठाकराळनें एका मागून एक आपलीं तीन ठिकाणीं पुरलेले कलश दाखवून त्यांतलीं रत्नें काढून दिलीं. राजाच काय सर्व प्रजा या तोतया तपस्वी मुनीच्या सेवेला हजर राहूं लागली.

एकदां राजा त्याला देवळांत घेऊन गेला. देवळांत प्रवेश करीत असतां एक कावळा 'काव' 'काव' करूं लागला. तपस्वी राजाला म्हणाला—"या देवळासमोर देखील एक रत्नकलश आहे. तो खणून काढून घे! असें तो कावळा सांगत आहे."

राजानें खणून पाहिलें तेव्हां त्याला खरोखरच एक रत्नकलश मिळाला. राजा त्या तोतया तपस्याला आदरपूर्वक देवळांत बोलावून घेऊन गेला. ध्वजस्तंभांत बसून कलावती तपस्वीवेषांत येत असलेल्या आपल्या पतीला पाहून रडूं लागली. ध्वज-




स्तंभाची मूर्ती रडूं लागलेली पाहून राजानें तपस्व्याला विचारलें "महाराज! हें काय अद्भुत पाहातों आहें?"

ठिठाकराळ तोंडावर दुःख वारत असल्याचें सोंग करून म्हणाला—"तोंडानें उच्चार करूं नये तें घडलें आहे. आतां मी काय सांगूं! तरी घरीं येण्यावर काय तें सांगेन." असें सांगून तो राजाबरोबर राजधानींत गेला. तो राजाला म्हणाला "राजा तूं देऊळ ज्या जागीं बांधलें आहेस ती जागा अशुभ व अपवित्र आहे. तूं ज्या मुहूर्तावर देऊळ बांधायला सुरुवात केलीस तो मुहूर्तदेखील बरोबर नव्हता. म्हणून ही मूर्त तुला पाहून रडत होती. तुझ्या आयुष्याची दोरी खुरत आली आहे. परंतु तुला दीर्घायु व्हायचें असेल तर तूं हें देऊळ पाडून टाकलें पाहिजेस. दुसऱ्या जागीं चांगला मुहूर्त पाहून तूं देऊळ बांधावें. त्यांत तुझें हित व प्रजेचें कल्याण आहे.

राजा घाबरून गेला. त्यानें दुसऱ्याच दिवशीं देऊळ पाडण्याची आज्ञा केली. नंतर ठिठाकराळनें दाखविलेल्या जागीं व सांगितलेल्या मुहूर्तावर राजानें दुसरें देऊळ बांधलें.

त्याचें काम भागलें. ठिठाकराळ आपला कपटी वेष सोडून उज्जैनला परत आला. शापमुक्ति मिळाल्यावर कलावती आपल्या पतीबरोबर इंद्राला भेटायला गेली. तिला पाहून इंद्र चकित झाला. तिला शापमुक्त करण्यासाठीं ठिठाकराळनें जी युक्ति केली त्याचें वर्णन ऐकून इंद्र पोट धरधरून हसला. त्यानें कलावतीबरोबर त्याला स्वर्गलोकीं राहण्याची परवानगी दिली. नंतर स्वर्गलोकां इंद्राच्या आज्ञेनें कलावतीचा विवाह ठिठाकराळशीं झाला.





परोपकारी गोपाळ

गोपाळ स्वभावानें उदार होता. त्यानें पात्र व अपात्र हा भेद कधीं केला नाहीं. दुःखी कष्टी, मग तो कोणी का असेना प्रत्युपकाराची अपेक्षा न ठेवतां तो त्याच्यावर उपकार करीत असे. परोपकार करण्यानें त्याला एक मानसिक आनंद मिळत असे.

गोपाळच्या गावाशेजारीं नाहरपुर नांवाचें एक गांव होतें. त्या गांवांत सर्वच गरीब होते. मोलमजुरी हा एकच एक धंदा त्यांच्या उदरनिर्वाहाचें साधन होतें. त्यांत लखू नांवाचा एक मजूर होता. गोपाळच्या औदार्याची कीर्ति त्यानें ऐकली होती. मजुरी केल्याशिवाय गोपाळच्या मदतीनें पोट भरतां येईल या आशेनें तो गोपाळकडे आला. म्हणाला—"मालक! मी गरीब आहें व मुलीचें लग्न डोक्यावर आहे. मुलीचें लग्न म्हणजे आईबापांचें दिवाळें हें आपणांस माहीतच आहे. तांदूळ विकत घ्यायलादेखील माझ्याकडे पैसे नाहींत. तुम्ही तांदूळ दिलेत तर आयुष्यभर मुलगी आपलें नांव काढील."

"बरें झालें, तूं पैसे नाहीं मागितलेस. कारण माझ्याकडे या घटकेस मुळींच पैसे नाहींत. भात आहे तें मी देतों. किती पाहिजे, सांग." गोपाळनें विचारलें.

"गांवभर जेवायला येणार. निदान एक पोतें तरी नको का?" लखू म्हणाला.

गोपाळनें त्याला एक पोतें भात दिलें. नवऱ्यामुलीसाठीं म्हणून चोळीलुगडें पण दिलें. म्हणाला—"नवऱ्यामुलीला लक्ष्मीतर्फे म्हणून सांगून दे."










लखू एक पोतें भात गोपाळच्याच गाडींत घालून आपल्या गावीं निघून गेला. गाडी त्यानें परत पाचनी केली.

लखूनें बायकोला ती गोष्ट सांगितली नव्हती. बायकोनें अर्थातच त्याला विचारलें "हें पोतें भरून भात आणि ही चोळीसाडी कोठून आणलीत ?"

" परोपकारी गोपाळ म्हणून आहे एक वेडापीर. त्याला मी सांगितले की मुलीचें लग्न आहे. त्यानं एक पोतें भात व ही साडीचोळी दिली. आतां दोन महिने नको काळजी करायला." तो म्हणाला.

"परंतु त्यांनी ही गोष्ट त्याला कळल्यावर बोभाटा होईल की ?" बायकोनें त्याला विचारलें


पण तो येतो आहे कशाला विचारायला आणि बोलाच आणि त्याला कळलेच तरी तो कोणाजवळ हें बोलणार देखील नाही." लखू म्हणाला.

लखूच्या बायकोला पोतें भरून भातापेक्षा ती नवीन साडी जास्त आवडली. दुसऱ्याच दिवशी ती तें लुगडें नेसून आपला मोठेपणा मिरवायला निघाली. तिला कोणी विचारलें की कोठून आणलीस ग ही साडी की

आमच्या घरी पाणी पिऊन थोडा वेळ आराम केला माझें फाटकें लुगडें त्यांनी पाहिलें असावें. एक साडी बायकोसाठी बरोबर घेऊन चालले होते ती साडी त्यांनी मला देऊन टाकली. नंतर एक पोतें भरून भात पाठवून दिलें" परंतु ज्यांनी ज्यांनी हें ऐकलें त्यांना तें खरें वाटलें नाही. कारण गावकऱ्यांनी लखूला एक पोतें भात गाडींत घेऊन येतांना पाहिलें होतें. गोपाळला आलेला कोणी पाहिला नव्हता.

ज्या दिवशी लखू गोपाळच्या घरी गेला होता त्या दिवशी त्यानें पाटलांच्या घरी काम करण्यासाठीं एक दिवसाची मजुरी आगोदरच घेऊन ठेवली होती. परंतु तो कामावर गेला नाही. लखू कामावर का आला नाहीं याची चवकशी करण्यासाठी पाटील स्वत: लखू रहात होता त्या बाजूला आले. गावकऱ्यांनी पाटलाला वर्दी करून येण्याचें कारण विचारलें

" लखू कामावर येईन म्हणून मागून गेला होता. पण तो आला नाहीं म्हणून स्वत:च







नवकरीसाठीं आलों आहे " पाटील म्हणाले
" आतां तो काय येतो कामावर ? त्याला एक पोतें भरून भात मिळालें आहे ना " गांवकरी म्हणाले. त्यांनीं लखूकडून व त्याच्या बायकोकडून त्याला पोतें भरून भात कसें मिळालें हें ऐकलें. सांगितलें पाटील स्वतः लखूच्या घरीं गेले व कामाला न येण्याचें कारण त्यांनीं विचारलें.

' मालक, तब्येत बरी नाहीं. मी तरी काय करूं ? तुम्ही जी मजुरी दिली आहे तिच्याबद्दल येऊन करीन केव्हांतरी काम." लखू म्हणाला.

' गोपाळकडून एक पोतें भात व बायकोसाठीं एक साडी मिळाली आहे नाहीं का तुला ? म्हणून असें बरें नसेल ? ' पाटलांनीं खोचक शब्दांत विचारलें.

" गोपाळरावांकडून एक पोतें भात मिळालें हें खरें आहे. माझी प्रकृति पण बरोबरच नाहीं. आपल्याला खरें वाटत नसेल तर तुम्ही दिलेली मजुरी ही परत घायला तयार आहें !" लखू म्हणाला.

" लखूनें त्यांनींच कांहीं तरी लबाडी केली आहे असें मला वाटतें. गोपाळकडे जाऊन चौकशी करून पाहिले पाहिजे " एक गांवकरी पाटलाला म्हणाला.

दुसरे गोपाळ शहाण होता त्या गांवीं गेले. ते गोपाळला भेटले व म्हणाले " अहो गोपाळराव ! तुम्हाला दान करायचें तर त्याला आमची ना नाहीं. पण पात्र अपात्र कांहीं पहाल की नाहीं ! सत्पात्रीं दान करणें ठीक आहे. फक्त एकदां तुम्हाला पाणी प्यायला दिलें म्हणून तुम्ही त्याला पोतें भरून भात व त्याच्या बायकोला साडी चोळी दिलीत हें ऐकून आम्ही थक्क झालों बुवा ! अहो तो आहे आळशी ! तुम्ही दिलेलें भात महिने दोन महिने त्याला पुरेल.

आहे तो घरीं "

गोपाळला तें ऐकून आश्चर्य वाटलें. म्हणाला " मुलीच्या लग्नासाठीं म्हणून त्यानें पोतें भरून भात मागितलें. तें मी दिलें व वर नवऱ्यामुलीसाठीं एक साडीचोळीपण दिली. हें काय मी वाईट केलें ?"

" बरें तर चला आमच्याबरोबर समजेल त्यानें घेतला आहे तो स्वाद. म्हणून त्याच्याकडून तुम्ही दिलेलें भात परत मागून घ्या " पाटील म्हणाले. " दिलेलें दान परत घेऊं नये परंतु तुम्ही म्हणतांच आहां तर मी येतों बरोबर व त्याला जाब विचारतों कीं तू लग्नाचें कां बोललास ! चला " असें सांगून गोपाळ त्यांच्या बरोबर निघाला.

गोपाळला येत असलेला पाहतांच लखू त्याचे पाय धरून माफी मागूं लागला.

गोपाळनें लखूच्या पोत्यांत उरलेलें भात गरीब गांवकऱ्यांना एकेक शेर वांटून दिलें.

लखूची बायको लाजत लाजत साडीची पुन्हा नीट घडी करून घेऊन आली व तिनें ती त्याच्यासमोर ठेवली. पण गोपाळ म्हणाला -" ती साडी राहूं द्या बाई तुमच्याच-कडे. तुमच्या नवऱ्यानें चूक केली. त्यांत तुमचा काय दोष ? पुन्हां त्यानें असें कधीं करूं नये अशी काळजी घ्या म्हणजे झालें "

परंतु त्या माउलीनें ती साडी घेतली नाहीं चांगल्या माणसाला फसविल्याबद्दल गांवकरी लोक नांवें ठेवीत होते. म्हणून तिनें ती साडी फाडून गरीब मजुरणींना वांटली व म्हणाली " गोपाळरावांचें नांव काढून त्याची चोळी शिवून घ्या "

त्यानंतर गोपाळला फसवून कोणाचें हित होणार नाहीं, ही गोष्ट प्रत्येकाला पटली





स्वयंसेवक

एका गांवीं जगन्नाथ नांवाचा एक गरीब मनुष्य रहात असे. परंतु त्याच्या मुलीच्या नशिबानें त्याला जांवई चांगला श्रीमंत मिळाला.

मुलगी पहिल्या बाळंतपणासाठीं म्हणून माहेरीं आली. तिला मुलगा झाला. ती आनंदाची बातमी जगन्नाथानें जांवयाला कळविली. बारशाला येणें शक्य नाहीं पण दोन महिन्यांनीं मुलाला व त्याच्या आईला आणण्यासाठीं येतों असें जांवयानें कळविलें. त्याप्रमाणें [illegible] जांवयांनीं [illegible] पाहिलें.

जांवई येणार म्हणून सर्वांना आनंद झाला. पण जांवयाचा आदरसत्कार नीट झाला पाहिजे म्हणून जगन्नाथ काळजींत पडला. घरची गरीबी झांकून राहाली पाहिजे व गरीबपण जास्त होतां कामा नये. जांवई बापूंच्या सेवेला एक नोकर ठेवला नाहीं तर बरें दिसणार नाहीं. म्हणून निदान एक दोन दिवस तरी एक नोकर ठेवलाच पाहिजे. [illegible] या गोष्टीवर बराच वेळ खलबत चालू होतें. काय करावें हें त्यांना कळेना. घराबाहेरून एक भिकारी त्यांचें बोलणें ऐकत होता. त्याला पक्वान्नांचा प्रसंग [illegible] आला. त्याचें नशीब उघडलें होतें त्या दिवशीं.


तो सरळ गांवातल्या विहिरीवर गेला. तेथें हात पाय धुवून त्यानें तेथें कोणाचे तरी कपडे होते ते उचलून अंगांत घातले व जगन्नाथाच्या घराशेजारीं भिंतीला टेकून कोणी पाहणार नाहीं अशा तऱ्हेनें उभा राहिला.

सौ. [illegible]

उभा राहिला. जगन्नाथ व त्याची [illegible] बाहेर येण्यापूर्वीच भिकाऱ्यानें पुढें येऊन गाडीतलें सामान बाहेर काढून घरांत आणून ठेवलें आणि जांवई बापूंच्या मागें जाऊन दाराजवळ उभा राहिला.

गाडीचा आवाज ऐकून जगन्नाथ बाहेर आला. जांवई बापूंना भेटण्याच्या गर्दीत त्याला एक मनुष्य त्यांचें सामान घेऊन घरांत आंत असलेला दिसला. त्याला वाटलें कीं जांवई बापूंच्या बरोबर कोणी नोकर आला असावा. जांवई बापूंना वाटलें कीं सासुरवाडचाच हो नोकर असावा. कोणी त्याच्याविषयीं कांहीं बोललें नाहीं. सासूसासऱ्यानें जांवई बापूंची बरदास्त ठेवण्यांत कोणतीहि उणीव राहूं दिली नाहीं. जांवई बापूंबरोबर त्याच्या नोकराचा पण आदर सत्कार खूप झाला. जांवई बापू आंत जेवायला बसले तर नोकराला बाहेर पडवींत त्यांच्याच बरोबर जेवायला वाढलें. आग्रह कर करून सर्व पदार्थ व पंच पक्वान्नें वाढलीं.

जेवण झाल्यावर जगन्नाथानें जांवयाला धोतर जोडी दिली. सासूनें लाडू जिलब्या



मरून एक कांदीच दिली. नोकराला पण एक करंडी देत म्हणाली -' आपल्या मुलांना दे हां बाबा '

जगन्नाथ बायकोला व मुलांना घेऊन दुसऱ्या दिवशीं निघाला. तो भिकारीच गाडी ठरवून घेऊन आला व त्यानें गाडींत सर्व सामान ठेवलें. जांवई बापू शेवटीं गाडींत बसले. बसतांना त्यांनीं सासूऱ्याचा नोकर समजून बक्षिस म्हणून भिकाऱ्याच्या हातांत एक रुपया ठेवला. भिकाऱ्यानें नमस्कार करून रुपया खिशांत टाकला.


गाडी निघून गेली. पण नोकर कांहीं गाडींत बसला नाहीं हें पाहून बायकोनें नवऱ्याला विचारलें "हें काय? मग तो नोकर कां नाहीं आला! त्याला तुम्ही पैसे देऊन पाठविलांत तो कोठें?"


"तो तुझ्या माहेरचा नोकर आहे, असें मला वाटलें" नवरा म्हणाला.

बायको म्हणाली "इश्श! तो नोकर आपला आहे असें आम्हां सर्वांना वाटलें." दोघे परस्परांच्या त्या गमतीदार चुकीबद्दल खूप हसले.

गाडी निघून गेल्यावर जगन्नाथाच्या बायकोनें नवऱ्याला विचारलें "तो नोकर त्यांच्याबरोबर गेला नाहीं वाटतें. आपली कोठें निघाला आहे? हा त्यांचा नोकर नाहीं की काय!"

"तर मग हा कोण होता?" त्यांचे नोकर ठेवला नव्हता व तो जांवईबापूंचा पण नोकर नव्हता. असाच कोणी उडाणटप्पू होता तर! त्याला का अशय एवढा मान दिला. दोघे नवरा बायको अवाक्‌ होऊन घरांत गेलीं.





युद्धकांड

बिभीषणानें रामाला अयोध्येला पोहाचविण्यासाठीं रावणाचें पुष्पक विमान आणविलें. रावणानें विमान आणि तें सुद्धा कुबेराकडून नेतलेलें. मग त्याची शोभा काय वर्णावी. सोन्याच्या कोंदणात बसविलेल्या रत्नांनीं झळपत होतें नुसतें. त्यात त्यावर सूर्य किरणें पडल्यावर विचारावयालाच नको असे तें विमान आल्याचें रामाला सांगून बिभीषणानें हात जोडून विचारलें– "आपली काय आज्ञा आहे?"

"या वानरांनीं पुष्कळ कष्ट केले आहेत त्यांना संतुष्ट करून आपली कीर्ति वाढव" असें सांगून त्यानें सुग्रीव, अंगद, वगैरेंचा निरोप घेतला. सुग्रीवादि वानरांनीं अयोध्येला येण्याची इच्छा दर्शविल्यावरून रामानें सर्वांनाच अयोध्येस येण्याचें निमंत्रण दिलें. त्या सर्वांना आपल्याबरोबर विमानांत बसवून निघाला.

अशा तऱ्हेनें श्रीराम, लक्ष्मण, सीता आणि इतर वानर मंडळी अयोध्येस निघालीं.

आकाशांतून जात असतां वाटेंत कोठें युद्ध झालें, कोठें कोणता राक्षस मारला, कोठें सेतु बांधला, कोठें शिवपूजा केली वगैरे स्थानें रामानें सीतेला दाखविलीं. बिभीषणाची त्याच्याशीं भेट झाली ती जागा देखील तिला दाखविली.



[illegible] विमान [illegible] पसरत [illegible] व त्यांची भेट कशी झाली [illegible] व [illegible] कशी भेट झाली हें सांगून वानर सैन्याने [illegible] वर्णन केले. त्यावर सीतेने तारा व इतर वानर [illegible] पण [illegible] म्हणून [illegible] आनंद [illegible] झाले.

[illegible] सीतेची [illegible] आकाशात उडाले. सीतेच्या कृपेनें त्यांना पुष्पक विमानांत बसण्याचें भाग्य लाभलें. त्यांनीं मनातल्या मनांत सीतेचे फार आभार मानले.

विमान उत्तर दिशेच्या [illegible] होतें. रामानें सीतेला [illegible] दाखविला आणि म्हणाला—“ [illegible] प्रथम भेट झाली. व येथेंच तुझे दागिने पाहायला मिळाले.” त्यानंतर शबरी भेटली ती जागा व जटायूचें रावणाशीं जेथें युद्ध झालें होतें ती जागा रामानें दाखविली. पंचवटींत जेथें रामलक्ष्मण व सीता झोपडी बांधून राहात तें रम्य स्थान दिसलें होतें [illegible] झाल्या [illegible]


[illegible] वेळांत [illegible] व सर्व [illegible] तिकडे [illegible] परंतु [illegible] मुनींच्या आश्रमाजवळ [illegible]

आश्रमांत [illegible] रामानें [illegible] मुनींस वंदन केलें आणि [illegible] मुनींच्या [illegible] तो एक दिवस तेथें राहिला.

त्यानें मारुतीस [illegible] सांगितलें, म्हणाला [illegible]


[illegible] कळव. सर्व वृत्त सांगतांना त्याच्या चेहेऱ्यावर उमटणारे भाव निरखून पाहा. कारण इतके दिवस राज्य केल्यावर एकाएकीं तें सुख गमावतांना त्याला दुःख होणें साहजिक आहे. बोलतांना त्याला राज्य करण्याची इच्छा आहे का? हें ओळखून आणि [illegible] आम्ही [illegible] निघाल्या [illegible] चतुर्थ [illegible] पूर्ण [illegible]

[illegible] मारुतीनें [illegible] आणि गंगा यमुना संगम [illegible] तेथें मनुष्य [illegible]



[illegible] आश्रमांतून निघाले आहेत” हें ऐकून निषादाला फार आनंद झाला.

मारुती निषादाचा निरोप घेऊन निघाला ना [illegible] नंदीग्रामाच्या वेशीवर येऊन [illegible] मनुष्यरूप घेतलें व [illegible] नंदीग्रामांत [illegible] दिवस [illegible] येण्याची वाट पाहात होता. [illegible] पूर्ण होत आले तरी अजून रामाच्या येण्याची काहींच खबर आली नाहीं म्हणून



तरी तो थोडा दुःखी आणि निराशसा दिसत चालला होता

चौदावर्षे पूर्ण होण्याच्या दिवशी भरत कारत चिंता करीत बसला असतां हनुमान मनुष्यरूपांत येऊन म्हणाला "महाराज, एक शुभसंदेश आणला आहे. रामानें रावणाचा वध केला आणि आतां सीता, लक्ष्मण आणि दुसरे किष्कींद पराक्रमी वीर यांना बरोबर घेऊन इकडे येत आहे."

तें ऐकून आनंदातिरेकानें भरत क्षणभर मूर्च्छित झाला. सावध होतांच त्यानें मारुतीला एकदम मिठी मारली आणि म्हणाला—"याच शुभ घडीची मी इतके दिवस वाट पाहात होतों. ही बातमी आणणारा तूं खरोखर देव मनुष्यच आहेस. यासाठीं मी तुला एक लाख गाई, शंभर गांवें आणि सोळा सुंदरकन्या बक्षीस देतों."

त्यानंतर दोघे बराच वेळ बोलत होते. मारुतीनें रामाविषयी सर्व सुरळीत साची माहिती भरताला सांगितली. अनेक प्रकारच्या संकटांना तोंड देऊन राम आतां निर्विघ्नपणें परत येत असल्याचें ऐकून भरताला फार बरें वाटलें. त्यानें शत्रुघ्नाला बोलावून आज्ञा केली. म्हणाला "श्रीराम येत आहे. त्याच्या स्वागतासाठीं सर्व नगरी सुशोभित कर. नंदीग्राम ते अयोध्या मार्ग स्वच्छ झाडून त्यावर सडा घालून फुलांची रांगोळी काढव"

भरताच्या आज्ञेप्रमाणें शत्रुघ्नानें सर्व तयारी केली. राम येणार ही बातमी कळतांच सर्व स्त्रीपुरुष मोठ्या थाटामाटानें त्याचें स्वागत करण्यासाठीं नन्दीग्रामाकडे जाऊं लागलीं. कौसल्या, कैकेयी वगैरे दशरथ राजाच्या सर्व राण्या पालख्यांतून बसून नंदीग्रामाला गेल्या.

सर्वांच्या पुढें भरत रामाच्या स्वागतासाठीं वेशीवर जाऊन उभा होता. बराच वेळ झाला तरी राम येण्याचें कांहीं चिन्ह दिसेना तेव्हां भरताला वाटलें कीं त्या ब्राह्मणानें खोटें सांगून माझी फसवणूक केली आहे.

परंतु त्याचवेळीं पुष्पक विमान दिसलें. पाहतां पाहतां तें जमीनीवर उतरलें देखील. धांवतच जाऊन भरतानें रामाचे पाय धरले. त्याबरोबर रामानें त्याला उठवून मिठी मारली. नंतर त्यानें मनुष्य रूपांत असलेल्या त्या सर्व वानरांचें स्वागत केलें. तो सुग्रीवाला म्हणाला "आजपर्यंत आम्ही चौघे भाऊ होतों. आजपासून आपण पाच जण झालों तू आम्हाला अगदीं भावा प्रमाणेंच आहेस."

रामानें मातांना वसिष्ठ गुरूला व इतर सर्वांना नमस्कार केला. सीतेनें पण वसिष्ठादिक मुनींस व कौसल्यादिक सासवांस नमस्कार केला.


सर्व मंडळी उतरल्यावर रामानें पुष्पक विमान कुबेराकडे पाठवून दिलें.

इतक्यांत भरत हातांत रामाच्या पादुका घेऊन आला. "रामा, केवळ तुझी आज्ञा म्हणून मी हें तुझें राज्य संभाळलें. आईचा शब्द खरा करण्यासाठीं चौदा वर्षे वनांत



राहून तुला फार कष्ट सहन करावे लागले या बद्दल वाईट वाटतें. पण तूं आतां सुखरूप परत आलेला पाहून फार फार आनंद वाटला. इतके दिवस तुझी ठेव म्हणून सांभाळलेलें हें राज्य तुझ्या स्वाधीन करतांना मला धन्यता वाटते." असें सांगून भरतानें त्या पादुका रामासमोर आणून ठेवल्या व रामाला पायांत घालून घ्यायला विनंती केली.

नंतर सर्वांनी मंगलस्नानें केलीं गंध लेपविलें. रामानें रेशमीवस्त्रें परिधान केलीं सोन्यामोत्यांचे अलंकार घातले व रथांत बसून अयोध्येस जाण्यास सिद्ध झाला.



शत्रुघ्न, लक्ष्मण, बिभीषण त्यांच्यावर छत्र चामर धरून चालले होते. भरत सारथी झाला. सुग्रीव शत्रुंजय नांवाच्या हत्तीवर बसून रामाबरोबर चालला होता.

स्त्रियांनीं सीतेला मंगलस्नान घालून अलंकार चढवून दिला, देखील इतर स्त्रियांबरोबर अयोध्येस नेलें.

दशरथाचा मंत्री वसिष्ठ पुढें तयारी करण्यासाठीं गेला होता. त्यानें रामराज्याभिषेकाची सर्व तयारी केली.

पथ्यांत रामाचा रथ दिसूं लागला. प्रजेनें आपापल्या घरावर गुढ्या उभारल्या. सैन्यानें जय गर्जना करून रामाचें स्वागत केलें. लोकांचे थवेच्या थवे राम दर्शनासाठीं मार्गावर दुतर्फा एकत्र झाले आणि रामाचा रथ वाजत गाजत दशरथ राजाच्या महालांत शिरला. रामानें रथांतून खालीं उतरतांच प्रथम भरताला आज्ञा केली कीं सुग्रीवाच्या राहाण्याची उत्तम व्यवस्था कर.

सुग्रीवानें आपल्या महालांत शिरतांच जांबवंत, हनुमान, वेगदर्शी आणि ऋषभ यांना बोलावून आज्ञा केली कीं त्या प्रत्येकानें एकेका दिशेला जाऊन चारी दिशांकडील समुद्रांचें पाणी उजाडण्याच्या अगोदर घेऊन यावें. कारण दुसरे दिवशीच रामाचा राज्याभिषेक व्हावयाचा होता. त्यासाठीं तें पाणी पाहिजे होतें. सुग्रीवाच्या आज्ञेप्रमाणें चौघे सोन्याच्या कलश घेऊन गेले आणि पहाटेच्या आंत पाणी घेऊन आले.

दुसरा दिवस उजाडतांच रामाला व सीतेला मंगलस्नान घालून रेशमी वस्त्रें नेसावयास दिलीं. नंतर चंदन अंगरागादि लेप लावून रत्नखचित अलंकार घालावयास दिले. नंतर त्यांना सुवर्ण सिंहासनावर बसविलें. तीं दोघें सिंहासनारूढ होतांच वसिष्ठ, वामदेव,



जाबाली, काश्यप, कात्यायन सुयज्ञ, गौतम, विजय आदि आठ महर्षींनी मंत्र घोषांत रामाचा अभिषेक केला. त्यानंतर ब्राह्मण, मंत्रि, सेनापति वगैरे मुख्य लोकांनी त्यांच्यावर अभिषेक करून त्यांना वंदन केलें. अशा तऱ्हेनें रामाचा राज्याभिषेक उत्तम तऱ्हेनें पार पडला.

त्यावेळीं देवेन्द्रानें रामासाठीं उपहार म्हणून शतकमल सुवर्ण हार वायुदेवाच्या हातीं पाठविला.

रामानें ब्राह्मणांना सवत्स धेनु, घोडे, सुवर्ण मुद्रा वगैरे दान केलें. पौर जनांना वस्त्राभूषण देऊन भूषविलें. सुग्रीवाला एक दिव्य कांचनमाला देऊन आदर केला. वानरांनाहि कांहीं उपहार देण्यांत आले.


नंतर रामानें सीतेला एक मोत्याची माळ देऊन म्हटलें—"ज्यानें आपल्या सेवेनें तुला संतुष्ट केलें त्याला ही माळ दे." अर्थातच सीतेनें ती मारुतीला दिली आणि त्यानेंहि ती माळ मोठ्या आदरानें गळ्यांत घातली.

बिभीषणालाहि यथोचित उपहार देऊन रामानें त्याला निरोप दिला.

राज्याभिषेकाचा सोहळा समाप्त होतांच सर्व वानर किष्किंधेला निघून गेले. बिभीषण लंकेला गेला.

रामानें आपल्या राज्याचा अर्धा भार लक्ष्मणावर टाकला व भरताला युवराज केलें. रामानें एकंदर शंभर अश्वमेध यज्ञ केले.

रामाच्या राज्यांत कोणालाहि दुःख नव्हतें, दुष्काळ नव्हता, अपमृत्युहि नव्हता. त्याची कारकीर्द आदर्श होती म्हणूनच चांगल्या राज्यकारभारास 'राम-राज्य' म्हणतात. [युद्धकाण्ड समाप्त]





औत्तम म्हणजे तिसरा मनु


सूर्यवंशांतील उत्तानपाद राजाला दोन बायका होत्या. सुनीति आणि सुरुचि. उत्तानपाद राजाचें राज्य सुरुचीचा मुलगा उत्तम या लाच मिळालें. कारण सुनीतीचा मुलगा ध्रुव घरांतून निघून गेला होता आणि उत्तम लाडक्या बायकोचा मुलगा असल्यानें राजाचाहि लाडका होता. बहुला बभ्रयाची मुलगी. उत्तम तिच्यावर मुग्ध झाला व तिच्याशी त्यानें लग्न केलें. पण बहुलाचें उत्तमावर प्रेम नव्हतें. ती त्याला थोड्या हीन दृष्टीनेंच पाहात असे.

एक दिवस राजा उत्तम आपल्या कांहीं राजकुमार मित्रांच्याबरोबर मद्यपान करीत बसला होता. बहुला तेथेंच होती. त्यानें मद्याचा प्याला तिच्यापुढें केला. परंतु तिनें त्याचा अव्हेर केला. आपल्या मित्रांच्या समोर झालेला हा अपमान राजाला असह्य झाल्यावरून त्यानें तिला वनवास दिला. या गोष्टीचें बहुलेला कांहींमात्र दुःख झालें नाहीं. राजाला मात्र फार वाईट वाटलें. कारण त्याचें तिच्यावर फार प्रेम होतें.

अशाच स्थितींत कांहीं दिवस गेले. एक दिवस सुशर्मा नांवाचा ब्राह्मण राजाच्या दरबारांत म्हणाला—"राजा, माझ्या बायकोला कोणी तरी पळवून नेलें आहे. तूं तिला शोधून आणून दे."

"तुझ्या बायकोला मी ओळखत नाहीं आणि तिला नेणारालाहि मी ओळखत नाहीं." राजा म्हणाला.

"नुसतें ओळखत नाहीं आणि माहीत नाहीं म्हणून भागणार नाहीं. आमच्या कष्ट निवारणाची सर्व जबाबदारी तुझ्यावरच आहे." सुशर्मा म्हणाला.





"तुझी बायको कशी काय आहे? केवढी आहे? कांहीं सांगशील तरी?" राजानें विचारलें.

"ती होय? पिचक्या डोळ्यांची, गालफडें बसलेली, ठेंगणी, काळी सांवळी अशी आहे. आणि साधी भोळी नाहीं, मोठी वस्ताद पाताळयंत्री आहे." सुशर्मानें आपल्या बायकोचें वर्णन केलें. राजा हंसून म्हणाला–"अरे, बरं झालं पीडा गेली म्हणून स्वस्थ बस झालें! फारच वाटलें तर दुसरं लग्न करा."

"असें काय बोलतोस राजा? अरे! पति संततीच्या रूपानें पत्नीच्या गर्भांतून कितीतरी वेळां जन्म घेत असतो. अशा पत्नीचें रक्षण न केलें तर फार संकटें उत्पन्न येतात. म्हणून पत्नी कशीहि असली तरी तिचें रक्षण करणें हा धर्म आहे. शिवाय देवा ब्राह्मणांसमोर अग्नीला साक्ष ठेवून जिच्याशीं लग्न केलें तिला सोडून दुसरें लग्न कर म्हणतोस, 'शांतम् पापम्', तो अधर्म आहे. तू माझ्या बायकोला शोधून आण. तिच्याविना माझी सर्व हव्यकर्मे थांबली आहेत."


सुशर्माच्या आग्रहावरून राजा निघाला. गांवोगांव हिंडतां तो एका मुनीच्या आश्रमांत आला. मुनीनें राजाच्या स्वागतासाठी शिष्यास अर्घ्य पाद्य आणण्यास सांगितलें. पण शिष्यानें गुरूला पुन्हां विचारलें. त्याबरोबर मुनीला आठवण होऊन तो राजाला म्हणाला–"राजा एक पक्षपर्यंत जरी ब्राह्मणाच्या कर्मांत खंड पडला तरी तो अस्पृश्य मानला जातो आणि तूं तर एका वर्षापासून बायकोला सोडून दिलें आहेस."

तें ऐकून राजा थक्कच झाला. क्षणभर थांबून त्यानें सुशर्माच्या बायकोविषयीं विचारलें. अंतरदृष्टीनें पाहून मुनि म्हणाले–"बलाक नांवाचा राक्षस सुशर्माच्या बायकोला पळवून घेऊन गेला आहे आणि त्यानें तिला कुत्पलावता नांवाच्या वनांत ठेवून दिलें आहे. तूं तिला सुशर्माकडे नेऊन पोहोंचती कर."

राजा बलाक राक्षसाकडे गेला आणि सुशर्माची बायकोला पळवून आणण्याचें कारण त्यानें राक्षसाला विचारलें.

बलाक म्हणाला–"हा कर्मठ ब्राह्मण प्रत्येक यज्ञांत आमची निंदा करीतो. त्याचें हें व्रत भंग व्हावें म्हणून आम्ही तिला पळवून आणली आहे. तूं मागत असशील तर आम्हीं तिला तिच्या घरीं पोहोंचती करतों."





तिला पोहोंचती करण्यास सांगून राजा मुनीकडे गेला व म्हणाला—"बायकोला सोडणें पाप आहे हें त्या बलाकानें निराळ्या तन्हेनें सांगितलें. माझी बायको कोठें आहे मला सांगा."

"तुझी बायको पाताळांत नागलोकांत आहे. कपोतराज नांवाच्या नागाचें तिच्या-वर प्रेम बसलें आणि तो तिला पळवून घेऊन गेला. परंतु त्या नागाची मुलगी नंदा हिला बहुलानें तिची सावत्र आई व्हावें हें पसंत नसल्यानें ती मुलगी तिचें ह्या अपवित्र कर्मापासून रक्षण करीत आहे."

मुनीचा निरोप घेऊन राजा आपल्या राजधानींत गेला. तेथें सुशर्मा दंपति आनंदानें राहात असलेली पाहून त्याला आपल्या बायकोची आठवण झाली. तो पुन्हां बलाकाकडे गेला व पाताळांतून [illegible] जवळ विनंती केली. बलाक राक्षस राजाच्या इच्छेला मान देऊन बहुलेला पाताळांतून सोडवून घेऊन आला.

सुदर्मानें 'मित्रविन्द' नांवाचा यज्ञ सात वेळां करून बहुलेच्या मनांतील पतिविषयींचें किल्मिष दूर केलें. तेव्हां पासून ती पतीवर पूर्वीप्रमाणें प्रेम करूं लागली.

आपल्या मुलीमुळें कपोतराज बहुलेशीं लग्न करूं शकला नाहीं म्हणून रागानें त्यानें तिला मुकी करून टाकलें. परंतु राजानें सारस्वत यज्ञ करून तिला पुन्हां वाचा देवविली. नंदानें संतोषून राजाला उत्तमपुत्र प्राप्तीचा आशीर्वाद दिला. त्या प्रमाणें राजाला लवकरच एक पुत्र झाला जो तिसरा मनु म्हणून प्रसिद्ध झाला. ह्याच पुत्राचें नांव औत्तम होतें.



[illegible]व्या शतकांतील घड्याळ

हें घड्याळ स्वित्झरलंडची राजधानी बर्न या शहरीं आहे. ह्याच्या दारावरची लहान 'डायल' महिना व दिवस दाखविते. त्याच्या उजवीकडील घरावर अस्वल व कोंबडे खेळतात. घड्याळाच्या वरच्या बुरुजावरून मनुष्याकृती वाहुल्या घंटा वाजवितात. तेच ठोके होते.

